

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते।
स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine August 2025 - Pages - 60**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे    कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७६ * अंक १० * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





सोमवार दि. १४ जुलै २०२५ रोजी संस्थेच्या कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ९ च्या
२४ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी
रौप्य महोत्सवी वर्षातील पदार्पणानिमित्त तयार केलेल्या बोधचिन्हाचे अनावरण करताना
प्रमुख पाहुणे डॉ. अमेय पांगारकर, समवेत डावीकडून संचालक श्री. आनंद कुलकर्णी,
संचालक श्री. सुनील रेडेकर, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे,
संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर
आणि संचालक श्री. रमेश कुलकर्णी

## ❋ कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ९ ❋



डॉ. अमेय पांगारकर यांचा सत्कार करताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, पाठीमागे संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर आणि श्री. रमेश कुलकर्णी



महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेताना संचालक डॉ. राजेंद्र कांबळे



उपस्थितांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड



महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती देताना उपप्राचार्या सौ. रेखा जोशी



उपस्थितांचे आभार मानताना आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्वाती जोशी

## ❋ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ❋



जिम्नॅस्टिक व एरोबिक्स जिल्हा निहाय स्पर्धेत यश मिळवणाऱ्या विद्यार्थिनी
कु. जान्हवी धिवरे, इ. ७ वी - सुवर्णपदक व रौप्यपदक
कु. आराध्या प्रशांत दिवेकर, इ. ६ वी - ३ सुवर्ण पदके,
कु. मृण्मयी दीक्षित, इ. ६ वी - २ सुवर्ण पदके



नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ करियर एज्युकेशन फाऊंडेशनतर्फे आयोजित राष्ट्रीय स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळवणारी कु. हंसिका सोनवणे, इ. ५ वी

संपादकीय

# संत ज्ञानेश्वर माऊली

मराठी सारस्वताचे एक अद्‌भुत लेणे म्हणजे संत ज्ञानेश्वर. जातीभेदाने पोखरलेल्या, अज्ञान, दारिद्र्य, परचक्र यांनी हतप्रभ झालेल्या समाजाला ज्ञानेश्वरांनी आत्मभान दिले.

ज्ञानेश्वरांचा काळ जर आपण बघितला तर, परकीय सत्ता दृढमूल होत असण्याचा तो काळ होता. राजकीय आणि सामाजिक पडझडीचा तो काळ होता. समाज अस्ताव्यस्त होत होता. अशा अराजक काळात ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रात अध्यात्मिक लोकशाही रुजवली. वारकरी संप्रदायाची निर्मिती करून दिशाहीन आणि ध्येयहीन समाजाला आत्मभान दिले. 'भाष्यकाराते वाट पुसतु' म्हणत, परंपरेशी नाते जोडत, मानवी जीवन तत्त्वज्ञान 'करतलामकवत्' स्पष्ट केले. सर्वसामान्य प्रापंचिकाला सहजपणे पेलता येणारा 'कर्मे इशु भजावा' हा संदेश दिला. कर्मकांडाचे बळी ठरणाऱ्या समाजाला सहजतेने आचरता येणारे भक्ती तत्त्व समाजात रूजवले. चंद्रभागेच्या काठी भक्तीचा डाव मांडून प्रवृत्ती आणि निवृत्तीची सांगड घातली. म्हणूनच आजही वारकरी संप्रदायाचे महत्त्व अबाधित आहे. आणि त्यामुळेच विज्ञानयुगातही दिवसेंदिवस 'वारी - तारी' हा संदेश लोकप्रिय होत आहे व वारीचे माहात्म्य वाढते आहे.

ज्ञानेश्वर हे मोठे तत्त्वचिंतक होते. प्रत्येक व्यक्तीला जीवन धर्म कळावा. जीवनातील श्रेय आत्मसात करता यावे म्हणून ज्ञानेश्वरांनी सर्व सामान्यांना पचेल आणि पटेल असे तत्त्वज्ञान मराठी भाषेत सांगितले. जनसामान्यांना शहाणे करण्यासाठी त्यांच्या परिचित भाषेचा वापर करून त्यातील सौंदर्य आणि सौष्ठव लोकांच्या मनावर बिंबवत ज्ञानेश्वर मराठी भाषेची थोरवी 'माझा मऱ्हाटीचा बोलु कौतुके I अमृताते पैजा जिंके I' असे मोठ्या अभिमानाने आणि ठामपणे सांगतात.

कुरूक्षेत्रावर आपल्या नातेवाईकांशी युध्द करण्याच्या विचाराने गर्भगळीत होऊन युध्दभूमीपासून दूर जाऊ इच्छिणाऱ्या अर्जुनाला श्रीकृष्णाने भगवत गीतेतून जीवन तत्त्वज्ञान उलगडून दाखवले. त्याचप्रमाणे प्रपंचाच्या रणभूमीवर गलितगात्र आणि दिशाहीन होणाऱ्या प्रापंचिकाला आत्मभानाची जाणीव करून देण्यास ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीची रचना केली.

ज्ञानेश्वरी हा मूलतः तत्त्वज्ञानपर ग्रंथ असला तरी, ज्ञानेश्वरीमध्ये आपल्याला ज्ञानेश्वरांच्या अद्‌भूत कल्पनाशक्तीच्या आणि कवित्व शक्तीच्या सामर्थ्याचा प्रत्यय ठिकठिकाणी येतो. पाण्यात पडलेल्या चांदण्याच्या प्रतिबिंबाचे वर्णन ज्ञानेश्वर करतात. 'जळी चंद्रिकेचिया पसरती वेली.'

खऱ्या साधूच्या पवित्रपणाचे वर्णन करताना ज्ञानेश्वर म्हणतात, 'काशीक्षेत्र हे जीवांना मोक्ष देण्यास खरोखर उदार आहे. पण तिथे मुमुक्षूचे शरीर पडावे लागते. हिमालय पर्वत पाप नाहिसे करतो पण, तिथल्या हिमवर्षावामुळे मृत्यूचा संभव फार असतो. गंगोदक अत्यंत पवित्र असले तरी तेथेही बुडी मारण्याची जरूरी असल्याने बुडण्याचा धोका संभवतो. परंतु साधूज्ञानाच्या खोलीचा अंत लागत नसला तरी, त्याच्या संगतीत साधकांना बुडण्याची भीती नसते' तर, 'याचि देही याचि डोळा' मोक्ष पदरात पडतो. ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञानेश्वर ठिकठिकाणी गुरूमहिमाही विस्ताराने वर्णन करतात.

'हे कृपाळू श्रेष्ठा श्रीगुरू माझ्या बुध्दीरूपी सुंदर वेलाला काव्यरूपी चांगले फळ ज्यायोगाने येईल तो वसंत ऋतू आपण व्हा. हे श्रीगुरू आपण माझ्याकडे कृपादृष्टीने पाहिले तर, माझ्या बुध्दीरूपी समुद्रातील स्फूर्तीला शांती आदी नवरसांची मोठी भरती येईल.

ज्या प्रमाणे हरळीची मूळी सामान्यतःच अमर आहे. जर तिच्यावर आणखी अमृताचा पूर आला तर, तिच्या अमरपणाविषयी शंकाच नको. त्याप्रमाणे श्रीगुरूंच्या प्रसादाने मूळ जी गीताशास्त्रातील पदे ती मी विस्ताराने वर्णन करेन. आपल्या ग्रंथ कर्तृत्वाचे सारे श्रेय ज्ञानदेव श्रीगुरूपादपद्मी अर्पण करतात.

त्याचप्रमाणे श्रोत्यांमुळे वक्त्याला बळ येते 'श्रोता दुचिता तरी, मांडिला रसु मोडे' असे म्हणत श्रोत्यांचे मोठेपण सांगतात.

ज्ञानेश्वर हे तत्त्वज्ञ असले तरी, त्या तत्त्वज्ञानात कोठेही जडता येत नाही. तर्ककर्कशता येत नाही. ज्ञानेश्वरी बरोबरच त्यांच्या अभंग, अमृतानुभव आदी ग्रंथ कार्यातून त्यांच्यातील कवी हा वारंवार डोकावताना दिसतो. म्हणूनच 'पाहुणे पंढरी रावो, घरा कै येती' हा शकून सांगणाऱ्या काऊला ज्ञानेश्वर 'तुझे सोनेने मढवीन पाऊ, दुधे भरून वाटी आणि दहीभाताची उंडी तोंडी' लावण्याचे आश्वासन देतात.

जीवनात स्वतःला संन्याशाचे पोर म्हणून हेटाळणी सहन करावी लागली असली तरी, कोणाहीबद्दल कटुता न धरता,

जो जे वांछिल तो ते लाहो प्राणिजात ।

म्हणून ज्ञानेश्वर पसायदान मागतात.

भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो. स्वातंत्र्य दिनाच्या आपणा सर्वांना शुभेच्छा.

दि. २९ जुलै २०२५
नागपंचमी

# वीरदेवो भव । हुतात्मा देवो भव।।

१८५७ च्या स्वातंत्र्य-युद्धाला शंभर वर्षे पूर्ण झाली. आजपर्यंत या क्रांतिसमराचा साकल्याने आणि साधार इतिहास लिहिला गेलेला नाही. तुटक तुटक खंडशः प्रकरणे उपलब्ध झाली आहेत. या वर्षीच्या शतसांवत्सरिक समारंभामुळे अखिल राष्ट्राचे लक्ष पुन: या इतिहासाकडे वळले आहे. पुढील चार-पाच वर्षांत या कालखंडाचा इतिहास लिहिला जाईल, अशी आशा आहे.

आज या कालखंडातील जी प्रकरणे, ज्या गोष्टी आणि जे प्रसंग उपलब्ध आहेत तेही अतिशय चित्तथरारक आणि स्फूर्तिदायक आहेत. कागदावर अद्याप न लिहिलेले असे कितीतरी रोमांचकारी प्रसंग उजेडात येतील! आपल्या देशातील स्वातंत्र्याचे प्रेम या प्रसंगांच्या स्मरणाने चिरंजीव करण्याचा प्रयत्न आपण करू या.

स्वातंत्र्ययुद्धाचा जय होईपर्यंत त्याला पराजयच येत असतो. तसेच १८५७ च्या युद्धाचे झाले. त्यापासून जशी स्फूर्ती घ्यावयाची तसा बोधही घेणे आवश्यक आहे. हा प्रयत्न का फसला? आपल्या समाजातील ज्या दुर्गुणांमुळे १८५७ चा प्रयत्न अयशस्वी झाला ते सर्व दुर्गुण आपल्यातून नष्ट झाले आहेत काय? आत्मनिरीक्षण करून सुधारणा करावयास पाहिजे. पण हा सतत चिंतनाचा आणि निदिध्यासाचा विषय आहे.

आजचा प्रसंग पुण्यस्मरणाचा आहे. हुतात्मा मंगल पांडे, बादशाहा बहादुरशाह, झीनतमहल, झाशीची राणी लक्ष्मीबाई, श्रीमंत नानासाहेब, श्रीमंत रावसाहेब पेशवे, सेनापती तात्या टोपे, कुँवरसिंह, अजीमुल्लाखान, श्री. बाबासाहेब नरगुंदकर (भावे), रंगो बापूजी इत्यादी ज्या वीर स्त्री-पुरुषांनी स्वातंत्र्यार्थ धारातीर्थी देह ठेविले. अगर अखेरपर्यंत झगडत राहिले. त्या सर्व ज्ञातअज्ञात अशा क्रांतिवीरांना प्रणामांजली वाहून अंशत: तरी ऋणमुक्त होऊ या. वीरदेवो भव । हुतात्मा देवो भव ।।

डॉ. ग. श्री. खैर (ऑगस्ट १९५७)

# डॉ. खैरकुल गीता-निधी स्मृती व्याख्यानमाला एकोणचाळीसावे पुष्प



**गीतामहर्षी स्वर्गीय गुरूवर्य डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर**

**स्थळ :**
**पुणे विद्यार्थी गृहाचे दादासाहेब केतकर सभागृह,**
मुक्तांगण इंग्लिश स्कूल आवार,
४४, विद्यानगरी, शिवदर्शन,
पर्वती, पुणे ४११००९.
फोन - ०२०-२४४७०९२७

स. न. वि. वि.

गीतामहर्षी व शिक्षणतज्ज्ञ स्वर्गीय गुरूवर्य डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या ३९व्या स्मृतिदिनानिमित्त **शुक्रवार दि. २९/०८/२०२५** रोजी **दुपारी ४ वाजता** प्रकट व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

**व्याख्याते : श्री. रासपती दास**

(आध्यात्मिक वक्ते आणि युवा मार्गदर्शक, इस्कॉन, पुणे )

**विषय : आधुनिक शिक्षण आणि गीतेतील रहस्ये**

कृपया आपण या कार्यक्रमास जरुर यावे, ही विनंती.

आपले नम्र

| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस.एम.जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
|---|---|---|---|---|---|
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

पुणे विद्यार्थी गृह, पुणे ४११ ०३०

## संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | | |
|---|---|---|
| Bank A/c Name | : | **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : | **Bank of Baroda** |
| Branch | : | **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : | **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : | **BARB0SADASH** |
| | | **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : | **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : | **411012009** |

बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल : pvgheadoffice@gmail.com

# संस्था मुख्यालय, पुणे

**कोषाध्यक्ष : श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

### शिष्यवृत्ती

संस्थेचे देणगीदार श्री. संजीव शांताराम मोघे, पुणे यांनी दि. १८ जुलै २०२५ रोजी रु. ३ लाखांची भरीव देणगी वडील कै. शांताराम सीताराम मोघे (मा. वि.) यांचे पुण्यस्मरणार्थ दिली आहे. सदर देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग संस्थेच्या पुणे ४११००९ येथील अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय तसेच विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील एकूण १५ गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत दि. १९ जुलै २०२५ रोजी देणगीदारांच्या शुभहस्ते धनादेश देऊन करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे पदाधिकारी, संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी उपस्थित होते. देणगीदार श्री. संजीव शांताराम मोघे यांनी सर्व विद्यार्थ्यांना चांगला अभ्यास करून यशस्वी व्हा असा शुभाशीर्वाद दिला. संस्थेच्यावतीने देणगीदार श्री. संजीव शांताराम मोघे यांचे आभार मानण्यात आले. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | वर्ग आणि शाखा |
|---|---|
| कु. रूपेश झा | अंतिम वर्ष इ अॅण्ड टी सी |
| कु. गायत्री दंडगे | अंतिम वर्ष कॉम्प्युटर |
| कु. अनुराग चव्हाण | अंतिम वर्ष इ अॅण्ड टी सी |
| कु. महेश थोरात | अंतिम वर्ष इ अॅण्ड टी सी |
| कु. नीरज सोमवंशी | अंतिम वर्ष इलेक्ट्रिकल |
| कु. रोहन घाडगे | अंतिम वर्ष इलेक्ट्रिकल |
| कु. सचिन ताटे | तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल |
| कु. प्रज्ञा पाटील | तृतीय वर्ष इलेक्ट्रिकल |
| कु. सानवी सोनावणे | तृतीय वर्ष इ अॅण्ड टी सी |
| कु. अथर्व करंजावणे | तृतीय वर्ष ए आय अॅण्ड डी एस |
| कु. प्रियांका लकडे | तृतीय वर्ष बीएस्सी (कॉम्प्युटर सायन्स) |
| कु. नवनाथ नरुटे | तृतीय वर्ष बी. कॉम. |
| कु. प्रतीक पाडीतकर | द्वितीय वर्ष एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) |
| कु. तन्मय वंडकर | तृतीय वर्ष बी. एस्सी (ॲनिमेशन) |
| कु. रोहन भंडारे | द्वितीय वर्ष एम. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स) |

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : श्री. व्ही. पी. गावडे**

### गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

गुरूवार दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. ईशस्तवनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते महर्षी व्यास व देवी सरस्वती यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. विद्याभवन नेरूळ शाखेचे माजी प्राचार्य श्री. भीमराव आडसूळ, तितिक्षा फाऊंडेशनच्या अध्यक्षा सौ. प्रिया दामले, चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया संस्थेचे अधिकारी श्री. गंगाधर सोनवणे, एमसीव्हीसी चे अध्यापक श्री. मल्लिनाथ वाघमोडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे अध्यापक श्री. प्रमोद चंदनशिवे यांनी पुष्प अर्पण करून महर्षी व्यास व देवी सरस्वती यांच्या प्रतिमांचे पूजन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यापिका सौ. प्राजक्ता चोपडे यांनी केले. प्रशालेतील इ. ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व आपल्या मनोगतातून सांगितले. इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांनी ''गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु'' यावर नृत्य सादर केले. चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया संस्थेचे अधिकारी श्री. गंगाधर सोनवणे यांचेकडून प्रशालेतील इ. ५ वी ते १२ वी च्या काही विद्यार्थ्यांना स्टेशनरी किट - वह्या, पेन भेट म्हणून देण्यात आले. याप्रसंगी तितिक्षा फाऊंडेशनच्या अध्यक्षा

सौ. प्रिया दामले यांनी प्राचार्य व्ही. पी. गावडे व प्रशालेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, उपस्थित मान्यवरांना पदक, पुस्तक व भेटवस्तू देऊन सत्कार केला. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी प्रशालेतील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी आणि उपस्थित मान्यवरांचा श्रीफळ देऊन सत्कार केला. गुरूपौर्णिमेनिमित्त मनोगत व्यक्त केलेल्या प्रशालेतील इ. ५ वी इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांना प्राचार्य व्ही. पी. गावडे यांच्या हस्ते वही व सौ. प्रिया दामले यांच्या हस्ते पुस्तक भेट देण्यात आले. या प्रसंगी अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते आणि चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया संस्थेचे अधिकारी श्री. गंगाधर सोनवणे यांनी आणि प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी विद्यार्थ्यांना गुरूपौर्णिमेची माहिती सांगितली. याप्रसंगी एन.सी.सी.च्या विद्यार्थ्यांना एन.सी.सी. चे ड्रेस देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुनंदा भाईक यांनी केले. या कार्यक्रमास प्रशालेतील इ. ५वी ते १० वीचे विद्यार्थी आणि सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. आभार प्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. कीर्ती राठोड यांनी केले. इ. ५ वी ते इ. १२ वी च्या काही विद्यार्थ्यांना स्टेशनरी कीट - वह्या, पेन सेट भेट म्हणून देण्यासाठी अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांचे अनमोल सहकार्य लाभले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

**पालक - शिक्षक सभा**

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ या वर्षातील पहिली पालक - शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे आयोजन प्राचार्य व्ही. पी. गावडे व पालक - शिक्षक संघ समितीप्रमुख अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. ही पालक - शिक्षक सभा प्रथम इ. ५ वी ते १० वी अशी सर्व वर्गशिक्षकांनी वर्गवार घेतली. नंतर ही सभा एकत्रित घेण्यात आली. या सभेत प्रत्येक वर्गातून पालक - प्रतिनिधी नेमून पालक - शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली व पदाधिकाऱ्यांची निवडही करण्यात आली. या सभेचे प्रास्ताविक अध्यापिका व पालक - शिक्षक समितीप्रमुख सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी तयार केलेल्या पी. पी. टी. च्या माध्यमातून शाळेतील २०२४ - २५ मध्ये झालेले सर्व उपक्रम पालक - शिक्षक सभेत पालकांना दाखवण्यात आले. प्रशालेत झालेल्या या सर्व उपक्रमांबाबत अध्यापक श्री. ज्ञानेश्वर दाते यांनी पालकांना माहिती दिली. प्राचार्य व्ही. पी. गावडे यांनी पालकांचे स्वागत केले आणि विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना, शालाबाह्य स्पर्धा, - परीक्षा, शालेय फी, संगणक फी, टेक्निकल फी, शाळेची शिस्त, स्वच्छता, गुणवत्ता, दैनंदिन उपस्थिती अशा विविध विषयांवर चर्चा केली. या पालक - शिक्षक सभेचे सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. फलकलेखन अध्यापक श्री. युवराज मिरखलकर यांनी केले. श्रीमती वैशाली मोघे यांनी उपस्थितांचे आभार मानले. ***

### * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**मोबाईल क्रमांक : ९६९९८७६२०३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

# शिशुनिकेतन मराठी माध्यम पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. अरुणा कांबळे**

**शाळा प्रवेशोत्सव**

शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ उत्साहात सुरू झाले. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांना औक्षण करून त्यांच्यावर फुलांच्या पाकळ्यांची उधळण करण्यात आली. यावेळी संचालक डॉ. राजेंद्र कांबळे हे आवर्जून उपस्थित होते. या वेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले.

**जागतिक योगदिन**

दि. २१ जून २०२५ रोजी योगदिन साजरा करण्यात आला. योगाने मन व शरीर कसे स्वस्थ राहते याची माहिती सौ. राधिका दडगे यांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितली.

ताडासन, वृक्षासन, भुजंगासन अशी विविध योगासने विद्यार्थ्यांनी केली. सौ. राधिका दडगे यांनी सूर्यनमस्काराचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना दाखवले.

**पालक सभा**

दि. २७ जून २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५ - २०२६ या वर्षातील पहिली पालकसभा आयोजित करण्यात आली होती. माँटेसरी ते चौथी पर्यंतचे सर्व पालक सभेला उपस्थित होते.

वर्षभरात राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सण - उत्सव, प्रकल्प, स्पर्धा यांची माहिती मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी पालकांना दिली. शाळेचा व पीटीचा गणवेश, शाळेची शिस्त, नियम, यांचीही माहिती पालकांना देण्यात आली. सौ. योगिता वांजळे यांनी 'डोअर टू स्टेप' या संस्थेतर्फे अप्रगत विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाविषयी पालकांना माहिती दिली. सौ. नूतन मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

**पालखी सोहळा**

शनिवार दि. ५ जुलै २०२५ रोजी विद्यार्थी संतांच्या आणि वारकऱ्यांच्या वेशात उपस्थित होते. टाळ, मृदंगच्या स्वराने वातावरण प्रसन्न झाले होते. सगळीकडे भगव्या पताका फडकत होत्या.

संत ज्ञानेश्वरांची पालखी संस्थेतील राममंदिरातील श्रीराम - लक्ष्मणाचे दर्शन घेऊन वाजत - गाजत निघाली. 'जय - जय विठ्ठल, जय हरी विठ्ठल' च्या जयघोषात टाळ वाजवत विद्यार्थ्यांनी फेर धरला. शाळेच्या परिसरास फेरी मारून खजिनाविहीर विठ्ठल मंदिरात विसावा घेऊन पालखी पुन्हा शाळेत प्रविष्ट झाली.

या पालखीमध्ये संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, महाराष्ट्र विद्यालयाचे प्राचार्य श्री. व्हि. पी. गावडे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक सामील झाले. मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांच्या हस्ते आरती झाली. सर्व विद्यार्थ्यांना राजगिरा लाडूचा प्रसाद देण्यात आला.

**गुरूपौर्णिमा**

दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा साजरी करण्यात आली. यानिमित्त बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी तितिक्षा इंटरनॅशनल संस्थेच्या संस्थापिका प्रिया दामले उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. अरुणा कांबळे यांनी केले. 'गुरूने दिला ज्ञानरूपी वसा' या प्रार्थनेने सभेला सुरूवात झाली. इ. १ली ते इ. ४ थी मधील विद्यार्थ्यांनी गुरू - शिष्यांच्या संदर्भातील गोष्टी, गाणी, माहिती सादर केली. गुरूपौर्णिमेनिमित्त सर्व शिक्षकांना पुस्तक व गुलाबपुष्प देण्यात आले. सौ. नूतन मोरे यांनी आभार प्रदर्शन केले.

***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**
**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**
**मुख्याध्यापिका : सौ. मनीषा नाईक (माध्यमिक)**

### इ. १० वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

दि. २५ जून २०२५ रोजी इ. १०वीतील यशस्वी विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सत्कार समारंभाच्या प्रमुख पाहुण्या मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक या होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. स्वरूपा मोरे यांनी केले. याप्रसंगी इ. १०तील गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वर्षात इ. १०वी व इ. ९वी मध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास कसा करावा, वेळेचे नियोजन कसे करावे व नियमितपणे अभ्यास केल्यामुळे कोणता फायदा होतो, याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. पर्यवेक्षिका सौ. मधुमती कदम व सौ. नीता गर्ग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इ. १०वीच्या शिक्षिका सौ. सोनाली शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. अल्पोपहाराने कार्यक्रमाची सांगता झाली.

### पालखी सोहळ्याचे आयोजन

शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ रोजी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक, दोन्ही विभागाच्या पर्यवेक्षिका, सांस्कृतिक विभाग प्रमुख यांच्या पालखी पूजनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. विठ्ठल, रूक्मिणी आणि विविध संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थी, पारंपरिक वेशभूषेतील सर्व विद्यार्थी यांनी शाळेचे प्रांगण फुलून गेले होते. शाळेच्या नावाचा फलक, विठ्ठलाची भक्ती गीते यांच्यासह सुंदर सजवलेली पालखी आणि छोट्या वारकऱ्यांचा मेळा पालखीच्या छोट्या वारीत आनंदाने सहभागी झाला. विठू नामाच्या जयघोषाने सारा परिसर भक्तिमय झाला. इ. ६वी ते इ. ८वीतील विद्यार्थ्यांनी लेझिमचे आणि इ. ३तील कु. अथांग या विद्यार्थ्याने मर्दानी खेळाचे प्रात्यक्षिक दाखवले. सर्व विद्यार्थ्यांना राजगिरा लाडूचा प्रसाद देण्यात आला.

### पालक सभेचे आयोजन

सोमवार दि. १४ जुलै २०२५ रोजी २०२५ - २६ या शैक्षणिक वर्षातील पहिल्या पालक शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी इयत्ता नर्सरी ते इ. १०वीतील सर्व वर्गांचे पालक प्रतिनिधी, दोन्ही विभागाच्या मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका, शिक्षक उपस्थित होते. सदर सभेत प्रथम मागील वर्षातील सभेतील मुद्द्यांवर आणि नंतर नवीन वर्षातील विविध विषयांवर चर्चा झाली. यात पालक शिक्षक समितीचे अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक आणि उपाध्यक्ष म्हणून सौ. हेमलता चव्हाण, सेक्रेटरी सौ. शिल्पा चितारे, सौ. जुन्नरकर यांची निवड करण्यात आली. माता पालक संघ प्रतिनिधी निवडण्यात आले. यासाठी सौ. सौम्या सानप आणि सौ. वाडकर यांची निवड करण्यात आली. या पालक सभेत शाळेच्या सर्व वार्षिक कार्यक्रमांचा आढावा घेण्याचा आला. परीक्षा व शिस्तीविषयी सूचना देण्यात आल्या. शाळेची फी पालकांनी वेळेत भरण्यासाठी काही धोरणे ठरवण्यात आली. सौ. मधुमती कदम, सौ. नीता गर्ग आणि सौ. स्वरूपा मोरे यांनी सूत्रसंचालन केले. शिक्षकांच्या कामाचे कौतुक, पालकांच्या सहकार्याची वाहवा आणि नवीन शैक्षणिक वर्षात नवीन आव्हानांना ताकदीने तोंड देण्याची तयारी हे मुख्याध्यापकांनी मांडलेले विषय आणि त्यांच्या अनुमोदनाने सभेची सांगता झाली.

***

## ✻ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा ✻




दि. २५ जून २०२५ रोजी इ. १०वीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी गुणवंत विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक, पर्यवेक्षिका आणि शिक्षिका



शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ रोजी पालखी सोहळ्यानिमित्त श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीची पूजा करताना मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक, समवेत शिक्षिका सौ. रूपाली मोझे




सोमवार दि. १४ जुलै २०२५ रोजी आयोजित पालक सभेत निवड झालेल्या समिती सभासदांना शाळेचे नियम समजावून सांगताना प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका सौ. नीता गर्ग, समवेत मुख्याध्यापिका सौ. मनीषा नाईक, मुख्याध्यापिका सौ. शिल्पा चितारे, पर्यवेक्षिका मधुमती कदम व पालक प्रतिनिधी

पालक सभेस उपस्थित पालक प्रतिनिधी व शिक्षक वृंद



# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्या : सौ. सुप्रिया देशकुलकर्णी**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### पालकसभा

विभागाची पहिली पालकसभा शुक्रवार दि. २७ जून २०२५ रोजी पार पडली. शिशु गट व छोटा गट यांची पालकसभा सकाळी ९.१५ ते १०.१५ या वेळेत तर मोठ्या गटाची पालक सभा सकाळी ११.०० ते १२.०० या वेळेत घेण्यात आली. पालकांना स्मार्ट टीव्हीद्वारे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन दाखविण्यात आले. तसेच शाळेच्या नियमांबद्दल, वर्षभर घेण्यात येणाऱ्या स्पर्धा, साजरे करण्यात येणारे विविध सण आणि अभ्यासाबद्दल शिक्षकांनी मार्गदर्शन केले व पालकांच्या शंकांचे निरसनही केले.

### महिना अखेर उपक्रम

सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी महिना अखेर उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी रंगीबेरंगी पोशाख परिधान करून आले होते. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी घोटीव कागदाची होडी करून चित्रकलेच्या वहीत चिकटविली. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी भेंडीचे ठसे घेतले. तर मोठ्या गटातील मुलांनी छत्रीचा आकार वहीत चिकटवून त्यात सुंदर रंग भरले. सर्व विद्यार्थ्यांनी विविध खेळ खेळून हा दिवस मोठ्या आनंदात साजरा केला.

### पालखी सोहळा

आषाढी एकादशी निमित्त शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ रोजी पालखी सोहळ्याचे आयोजन आगळ्या वेगळ्या पद्धतीने केले होते. विद्यार्थ्यांनी त्यांच्या आईसोबत दिंडीत सहभागी होऊन पंढरीचा विठुराया व वारी यांचा अनुभव घेतला. सर्व गटातील बालचमू विठ्ठल, रखुमाई, श्री. संत तुकाराम महाराज व अनेक संतांचा वेश परिधान करून व वारकरी बनून उत्साहाने यात सहभागी झाले होते. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली व विभागप्रमुख सौ. जया शेट्टी यांनी पालखीचे स्वागत व पादुकांचे पूजन केले. त्यानंतर आरती झाली व टाळ मृदुंगाच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. सर्व माता-पालक अतिशय उत्साहाने यात सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक रिंगण व फुगड्या खेळल्या गेल्या. विठ्ठलाच्या नाम स्मरणाने वातावरण अतिशय मंगलमय झाले होते. या कार्यक्रमामध्ये शाळेच्या इतर विभागांचे शिक्षकवृंदही सहभागी झाले होते. शाळेत जणू पंढरपूर अवतरले होते. या सोहळ्याचा समारोप सर्वांना खिचडी व राजगिरा वडीचा प्रसाद वाटून करण्यात आला.

### वृक्षारोपण सप्ताह

जुलै महिन्यातील पहिला आठवडा हा 'वृक्षारोपण सप्ताह' म्हणून साजरा करण्यात येतो. प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षीही सोमवार दि. ७ जुलै २०२५ रोजी सर्व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण सप्ताह साजरा केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व व उपयोग समजावून सांगितले. तसेच त्यांना 'एकता का वृक्ष' ही ॲनिमेटेड फिल्म दाखविली. शिशु गटाने झाडाच्या मोठ्या चित्रावर हिरव्या रंगानी पंज्याचे ठसे उमटवले. छोट्या गटाने चित्रकलेच्या वहीत पानांचे ठसे उमटवले तर मोठ्या गटाने चित्रकलेच्या वहीत मनगट व पंज्याचे ठसे उमटवून त्याला पाने काढून झाडाचे चित्र तयार केले.

### गुरूपौर्णिमा

गुरूवार दि. १० जुलै २०२५ रोजी पूर्व प्राथमिक विभागात गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. सर्व प्रथम महर्षी व्यास मुनींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी 'गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु' या श्लोकाचे पठण केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरूंचे महत्त्व सांगितले. शिशु गटातील आणि छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत पादुकांचे चित्र रंगविले व फुले चिकटविली. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी पादुकांचे चित्र रंगविले.

**प्राथमिक विभाग**

### पालक-शिक्षक सभा

शुक्रवार दि. २७ जून २०२५ रोजी या शैक्षणिक वर्षातील पहिली पालक - शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, शाळेतील सुविधा, विविध उपक्रम, शिस्त इत्यादी विषयांवर सभेमध्ये चर्चा झाली. या पालक सभेस सर्व वर्गांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदान घेऊन पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली.

### पालक प्रतिनिधी सभा व माता- पालक सभा

शनिवार दि. ५ जुलै २०२५ रोजी पालक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी यांची सभा घेण्यात आली. या सभेत मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली व पर्यवेक्षिका सौ. शिरीन अकोलावाला व सौ. कोमल कुलकर्णी यांनी महत्त्वाच्या विषयांवर पालकांशी चर्चा केली. शाळेतील विविध उपक्रमांविषयी यावेळी माहिती देण्यात आली. प्राथमिक विभागातील सर्व शिक्षक यावेळी उपस्थित होते.

### इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी इ. १ ली ते ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्यांचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अद्विता डावरी | १अ | प्रथम |
| कु. ईशान शिरापुरी | १ इ | द्वितीय |
| कु. सृष्टी ढेंबरे | १ ब | तृतीय |
| कु. संस्कृती धवन | २ अ | प्रथम |
| कु. शिवांश शिंदे | २ ड | द्वितीय |
| कु. चिन्मय तांबेकर | २ इ | तृतीय |
| कु. कैवल्य मोरे | ३क | प्रथम |
| कु. कृष्णा जाट | ३ब | द्वितीय |
| कु. प्रीती धाडीवाल | ३ अ | तृतीय |
| कु. दुर्वा खराटे | ४ क | प्रथम |
| कु. रिया सुरे | ४ इ | द्वितीय |
| कु. आराध्या गोरे | ४ ब | तृतीय |
| कु. समीक्षा सुरवसे | ५ इ | प्रथम |
| कु. अबीर मोहिते | ५ क | द्वितीय |
| कु. स्वरा यादव | ५ इ | तृतीय |
| कु. स्वरा कुलकर्णी | ५ क | तृतीय |
| कु. अर्पिता करजगी | ६ क | प्रथम |
| कु. आर्या साखरे | ६ इ | द्वितीय |
| कु. स्वरा दळवी | ६ अ | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन !**

### गुरूपौर्णिमा

गुरूवार दि १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ. अवधूत भोसले हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शालेय जीवनातील शिस्तीचे महत्त्व, ध्यानधारणा याविषयी मार्गदर्शन केले. इ. १लीच्या विद्यार्थ्यांनी शाल व श्रीफळ देऊन पाहुण्यांचा सत्कार केला. इ. ४ थी व ६ वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या इंग्रजी, मराठी व हिंदी भाषणातून गुरूपौर्णिमेची माहिती सांगितली. याप्रसंगी सर्व शिक्षकांना श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.

### कब, बुलबुल

शनिवार दि. १२ जुलै २०२५ रोजी पुणे शहर भारत स्काऊट अँड गाईड यांच्या वतीने स्थानिक संस्था सदाशिव पेठ येथे वर्षारंभ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात इ. ३री मधील एकूण १२ विद्यार्थी सहभागी झाले. ज्यामध्ये ६ कब व ६ बुलबुल यांचा समावेश होता. कबमधील विद्यार्थ्यांनी कब-बुलबुलच्या नियमांवर आधारित नाटिका सादर केली तर बुलबुलच्या विद्यार्थिनींनी समूहगान गायले. शिक्षिका पल्लवी देशपांडे, सारिका करकंडे व शिक्षक बलराज शोभणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### अभिनंदनीय

रविवार दि. २ मार्च २०२५ रोजी झालेल्या इ. ४ थी ते ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित गणित विषयाच्या परीक्षेमध्ये एकूण १०६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी एकूण ९४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. परीक्षेचा एकूण निकाल ८९.०७% इतका लागला. **सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन !**

## माध्यमिक विभाग

### पालक शिक्षक सभा

दि. २७ जून २०२५ रोजी इ. ७ वी ते १० वीच्या पालकांची सभा आयोजित करण्यात आली होती. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून वर्गशिक्षकांनी पालकांशी शालेय महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली व त्यांच्या शंकांचे निरसन केले. सर्व वर्गशिक्षकांनी आणि प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी पाठ्यक्रम आणि परीक्षांचे स्वरूप यावर सविस्तर माहिती पालकांना देऊन त्यांच्याशी संवाद साधला. या सभेत पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. सर्व पालकांनी सभेस चांगला प्रतिसाद दिला.

### पालक प्रतिनिधी सभा व माता पालक प्रतिनिधी सभा

दि. ५ जुलै २०२५ रोजी विभागाची पहिली शिक्षक - पालक प्रतिनिधी सभा व माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली. या सभेत उपस्थित पालक प्रतिनिधींमधून काही पालकांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. यावेळी प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांनी उपस्थित पालक प्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या सभेसाठी पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे, सौ. विजया काळे, विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. स्वाती निकम तसेच इ.५ वी ते इ. १२ वीच्या वर्गशिक्षिका व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

### आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

दि. ५ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशीनिमित्त ओपन डायस कार्यक्रमांतर्गत शालेय परिपाठात शिक्षिका सौ. मोहना बाभळे यांनी आषाढी एकादशीचे महत्त्व सांगितले आणि शाळेतील विद्यार्थ्यांनी सुंदर अभंग सादर केला.

### विद्यार्थी प्रतिनिधींची निवड

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेच्या जनरल सेक्रेटरी, कल्चरल सेक्रेटरी, स्पोर्ट्स सेक्रेटरी या पदांसाठी विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. तसेच बोस, टिळक, विवेकानंद व टागोर या चारही कुलांचे 'कॅप्टन' आणि 'व्हाइस कॅप्टन' या पदांसाठीच्या विद्यार्थी प्रतिनिधींना शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी निवडून दिले. या विद्यार्थ्यांच्या सर्व बॅजेसचे वितरण प्राचार्या सौ. सुप्रिया देशकुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे, सौ.विजया काळे तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

### गुरूपौर्णिमा

दि. १० जुलै २०२५ कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात 'परंपरा आणि उत्सवाचा तसेच गुरू शिष्य यांच्या शाश्वत बंधाचा' सन्मान करण्यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि मान्यवर यांच्या उपस्थितीत हा सोहळा साजरा करण्यात आला. समारंभाची सुरूवात विद्यार्थ्यांच्या सुरेल ईशस्तवनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रेरक वक्ते डॉ. संजय उपाध्ये यांनी महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन केले. विद्यार्थिनी कु. तीर्था जोतावर इ. १०वी ब हिने प्रास्ताविक करून प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. पाहुण्यांचा सत्कार विद्यार्थी कु. वेदांत वासकर, इ. १० वी अ आणि विद्यार्थी ऑस्टिन नवगिरे, इ. १० वी ड यांनी केला. विद्यार्थिनी कु. रितू जोशी, इ. १० वी अ आणि विद्यार्थिनी कु. मनाली गोतरणे, इ. १० वी ड यांनी

गुरूपौर्णिमेचे महत्त्व सुंदर शब्दांत मांडले. त्यानंतर प्रमुख पाहुणे डॉ. संजय उपाध्ये यांच्या हस्ते इ. १० वी आणि १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच पालक शिक्षक समितीच्या नियामक मंडळाच्या प्रमुख सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. श्री. संजय उपाध्ये यांनी महाभारतातील कथांचे उदाहरण देऊन ज्ञान व विवेक याचा उत्तम संगम सांधला तर जीवन समृद्ध होईल, तसेच योग्य अयोग्यतेची निवड कशी करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांवर संस्कार व्यायामाने व वाचनाने होतात असेही ते म्हणाले. यशाला गवसणी घालण्यासाठी प्रयत्नांची शर्थ करावी लागते व त्यासाठी आपण सक्षम कसे व्हावे याचेही मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी कु. रूची जोशी, इ. १० वी अ हिने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**मराठी हस्ताक्षर स्पर्धा**

दि. १० जुलै २०२५ रोजी इ. ७ वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे -

**लहान गट ( इ ७वी, इ ८वी)**

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इ/तु** | **क्रमांक** |
|---|---|---|
| कु. ईशा प्रसाद कुलकर्णी | ८ वी ड | प्रथम |
| कु. पृथ्वी हुंडेकरी | ८ वी ब | द्वितीय |
| कु. सर्वज्ञा जाधव | ७ वी ब | तृतीय |

या स्पर्धेसाठी सौ. सारिका मोहिते यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**मोठा गट (इ. ९ वी, इ. १० वी)**

| **विद्यार्थ्याचे नाव** | **इ/तु** | **क्रमांक** |
|---|---|---|
| कु. पृथा हुंडेकरी | ९ वी ब | प्रथम |
| कु. मृदुला भुजबळ | १० वी इ | द्वितीय |
| कु. वेदांत साकोरे | १० वी अ | तृतीय |

या स्पर्धेसाठी सौ. सुप्रिया पाटसकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

**ॲडव्हेंचर क्लब तर्फे ट्रेकचे आयोजन**

दि. २० जुलै २०२५ रोजी मुक्तांगण 'ॲडव्हेंचर क्लब'तर्फे आयोजित ट्रेकमध्ये इ.७वी आणि ८वीचे २० विद्यार्थी सहभागी झाले. जी. जी. आय. एम. च्या मार्गदर्शकांसोबत विद्यार्थ्यांनी 'लोहगड' येथे ट्रेक करत गडावरील निसर्ग सौंदर्य आणि गडाचा इतिहास अनुभवला. याच क्लबतर्फे आयोजित भोरगिरी ते भीमाशंकर या ट्रेकमध्ये इ. ९वी आणि इ. १०वी चे ७२चे विद्यार्थी सहभागी झाले होते.

**शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांचे भरघोस यश**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केलेल्या पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल दि. ३ जुलै २०२५ रोजी जाहीर करण्यात आला. या परीक्षेत विद्यार्थ्यांनी भरघोस यश संपादन केले.

परीक्षेस बसलेले विद्यार्थी : ४४
उत्तीर्ण विद्यार्थी : ४४
शिष्यवृत्तीस पात्र विद्यार्थी : २०

✻ कु. नंदिनी सागडे या विद्यार्थीनीस ७५.६८% गुण मिळाले. तिचा गुणवत्ता यादीत ४१० पैकी २१०वा क्रमांक आला.

✻ कु. ओम सावंत या विद्यार्थ्यास ७४.३२% गुण मिळाले. त्याचा गुणवत्ता यादीत ४१० पैकी २३८वा क्रमांक आला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

**आयुका भेट**

दि. १२ जुलै २०२५ रोजी इ.९ वी चे ११ विद्यार्थी त्यांच्या शिक्षिकांसह आयुका, पुणे येथे एका व्याख्यानास उपस्थित होते. त्यांचा विषय आकाशगंगा (गॅलेक्सी) असा होता. आयुकाचे संचालक प्रोफेसर श्री. आर. श्रीनंद यांनी 'आकाशगंगा' या विषयावर सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली.

**स्मार्ट गर्ल्स आणि स्मार्ट बॉईज कार्यशाळा**

दि. १२ जुलै २०२५ रोजी इ. ७वी व ८वीच्या विद्यार्थिनींसाठी 'स्मार्ट गर्ल्स' व विद्यार्थ्यांसाठी 'स्मार्ट बॉईज' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

विद्यार्थी, विद्यार्थ्यांचा विकास व पौगंडावस्थेतील होणारे शारीरिक व मानसिक बदल असे या कार्यशाळेचे विषय होते. शिक्षिका सौ. दीपाली केळकर यांनी स्मार्ट बॉईज कार्यशाळेअंतर्गत विद्यार्थ्यांना दृकश्राव्याच्या माध्यमातून वयानुसार घडणाऱ्या शारीरिक व मानसिक बदलाविषयी मार्गदर्शन केले व गोष्टींच्या माध्यमातून चांगल्या गुणांची रूजवणूक केली. यावेळी सौ. इंद्रायणी आपटे, सौ. प्राजक्ता खरे, व श्री. उमेश देशपांडे यांनी देखील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याच दिवशी कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात विद्यार्थिनींसाठी 'स्मार्ट गर्ल्स' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षिका सौ. श्रध्दा लाळे आणि सौ. तन्मया सहस्रबुद्धे यांनी देखील दृकश्राव्य माध्यमातून पौगंडावस्थेनुसार मुलींमध्ये होणारे बदल, चांगल्या व वाईट स्पर्शाची माहिती दिली. मोबाईलचा अति वापर, विविध प्रलोभने या सगळ्यांचा शरीरावर होणारा परिणाम यावर मार्गदर्शन केले. यावेळी सौ. प्राजक्ता खरे आणि शाळेतील शिक्षिका उपस्थित होत्या. सौ. प्रियंका केरकर यांनी मुलींना लाठीकाठी संबंधी प्रशिक्षण दिले.

**अभिनंदनीय**

❊ शिक्षिका सौ. तृप्ती पाटील यांनी एम. एड. हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम ८६.४५% गुण मिळवून यशस्वीरित्या पूर्ण केला.

❊ शाळेतील क्रीडा शिक्षिका आणि असोसिएट एनसीसी फर्स्ट ऑफिसर सौ.अनिता गायगोळे यांनी M. Ped. हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

❊ पुणे विद्यार्थी गृह माजी विद्यार्थी संघटनेतर्फे दिला जाणारा गुरूवर्य गीता महर्षी डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५, प्राध्यापिका डॉ. सौ. स्वाती निकम यांना देण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा पुरस्कार संस्थेच्या वर्धापन दिनी दि. १२ मे २०२५ रोजी संस्थेच्या प्रमुख कार्यालयात पार पडलेल्या समारंभात प्रदान करण्यात आला. **सर्व यशस्वी शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ❊❊❊

**❊ मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ❊**



**आषाढी एकादशी निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी विठ्ठल रुक्मिणी, विविध संत आणि वारकऱ्यांच्या वेशातील विद्यार्थ्यांसमवेत मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली आणि शिक्षिका**



**गुरूपौर्णिमेनिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी महर्षी व्यास यांचे प्रतिमापूजन केल्यानंतर चित्रकलेच्या वहीतील पादुकांचे रंगवलेले चित्र दाखवताना विद्यार्थिनी**

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

## महाविद्यालयाचा २४ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

दि. १४ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाचा २४ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा भव्य सोहळा कुलगुरू कै. दादासाहेब केतकर सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमात प्रथम श्री. सिद्धांत खंडागळे यांच्या सर्जनशीलतेतून साकारलेला लोगो आणि महाविद्यालयाच्या २४ वर्षांच्या यशोगाथेवर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची मंगलमय सरूवात झाली. संस्थेचे गीत व महाराष्ट्र गीत सादर करून सभागृहात प्रेरणादायी वातावरण निर्माण करण्यात आले.

श्री. वासुदेव वाघ यांच्या मनमोहक बासरी वादनाने आणि कु. श्रिया कुलकर्णी यांच्या तालबद्ध तबला साथीने वातावरण भारावून टाकले. त्यांना कु. सायशा नाईक आणि कु. सई आर्टे यांनी आपल्या सुमधुर स्वरांनी साथ दिली. बासरीच्या स्वरांनी शांतीची अनुभूती दिली. तर तबल्याच्या तालांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. सुमधूर स्वरांमुळे समारंभाची सुरूवात भक्तीपूर्ण आणि प्रसन्न झाली. प्रत्येक सूर, प्रत्येक ताल आणि प्रत्येक शब्द यामध्ये एक वेगळ्याच सकारात्मकतेची प्रचीती उपस्थितांना या अप्रतिम सादरीकरणातून अनुभवायला मिळाली. सभागृहात एक विशेष ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले. या सर्व कलावंतांच्या कलागुणांना सर्वांनी मनापासून दाद दिली.

प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत करत महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला आणि आगामी रौप्यमहोत्सवी वर्षाचे ध्येय मांडले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. अमेय पांगारकर, मार्केटिंग आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे तज्ज्ञ यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी भूषविले. तसेच या प्रसंगी कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, श्री. सुनील रेडेकर, प्रा. राजेंद्र कडुसकर व श्री. रमेश कुलकर्णी आणि संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे हे उपस्थित होते.

माजी संचालक मा. श्री. एम. एन. देशमुख, मा. डॉ. निहार वाळिंबे आणि माजी प्राचार्य डॉ. यू. एन. कुलकर्णी हे सुध्दा या प्रसंगी उपस्थित होते, त्यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. उपप्राचार्या सौ. रेखा जोशी यांनी महाविद्यालयाच्या वाटचालीचा सुरेख आढावा घेतला. वार्षिक उपक्रम दिनदर्शिकेचे प्रकाशन प्रमुख पाहुणे डॉ. अमेय पांगारकर यांच्या हस्ते पार पडले.

संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी महाविद्यालयाच्या शिक्षण व सर्वांगीण प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले. त्याचबरोबर महाविद्यालय रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश, हे महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी योगदान दिलेल्या सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे, असेही नमूद केले. तसेच महाविद्यालयाचे पहिले संचालक डॉ. प. भ. कुलकर्णी यांची आठवण करून दिली. डॉ. प. भ. कुलकर्णी हे दूरदृष्टी असलेले नेतृत्व होते, ज्यांनी संगणकशास्त्र क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञान आणि भक्कम पायाभूत सुविधांची गरज ओळखून या महाविद्यालयाच्या विकासाचा पाया रचला, असे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना संगणकशास्त्राच्या क्षेत्रात आघाडीवर नेण्यासाठी त्यांच्यात क्षमताविकास करणे हे संस्थेचे ध्येय आहे. संस्थेने नेहमीच या महाविद्यालयाच्या विकासासाठी मदत केली आहे आणि संचालक

प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे या महाविद्यालयाने प्रगती केली आहे. तसेच संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांचे महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासात आणि इमारत उभारणीमध्ये मोलाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

मुख्य अतिथी डॉ. अमेय पांगारकर यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनातील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) भूमिकेबाबत आपले विचार मांडले. बदलत्या शैक्षणिक प्रणालीमध्ये शिक्षकांची भूमिका अधिक व्यापक होत असून, विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखविणे आणि नैतिक मूल्ये जोपासणे ही जबाबदारी शिक्षकांवर अधिकाधिक येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी उपस्थितांना तंत्रज्ञान व सर्जनशीलतेचे महत्त्व पटवून दिले.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या म्हणजेच (AI) च्या नव्या युगात विद्यार्थ्यांची रोजगारयोग्यता वाढवण्यासाठी कोणत्या कौशल्यांचा विकास करणे आवश्यक आहे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी डिजिटल कौशल्ये, समस्या सोडवण्याची क्षमता आणि सतत शिकण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे, असे त्यांनी नमूद केले. तसेच, विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्यांसोबतच संवाद कौशल्ये, सर्जनशीलता आणि संघटन कौशल्यांचा विकास करणे गरजेचे आहे असेही त्यांनी सांगितले.

आभार प्रदर्शन आयक्यूएसी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी केले. त्यांनी प्रमुख पाहुणे, गौरवमान्य पाहुणे, संचालक, माजी संचालक व प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. माहितीपट निर्मिती व लोगो डिझाईनसाठी श्री. सिद्धांत खंडागळे यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. तसेच सांस्कृतिक विभाग, आयोजन समिती व सेवकवर्गाचेही विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. तेजल चोथे आणि सौ. स्नेहल जाधव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान होते.

कार्यक्रमाचा समारोप सौ. सायली बापट यांनी सादर केलेल्या मंगल पासायदानाने करण्यात आला. महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षाकडे भक्कम पाऊल टाकले असून, हा २४ वा वर्धापन दिन महाविद्यालच्या शैक्षणिक यशाचा प्रेरणादायी टप्पा ठरला.

**स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती दिनविशेष**

दि. २८ मे २०२५ रोजी स्वातंत्र्यसैनिक, क्रांतिकारक, साहित्यिक आणि हिंदुत्वाचे प्रवर्तक विनायक दामोदर सावरकर यांच्या जन्मदिवसाच्या निमित्त महाविद्यालयाच्या कर्मचारी वृंदांनी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन केले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारांची आणि कार्याची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी या उद्देशाने ग्रंथालय विभागातर्फे बी.बी.ए प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी वीर सावरकर जीवनपटलावर तसेच क्रांतिकारी, साहित्यिक, सामाजिक योगदानावर आधारित प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे आयोजन व आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी केले. विजेत्या विद्यार्थ्यांना ग्रंथपाल प्राजक्ता लोकूर यांनी बक्षिसे देऊन गौरविले.

**जागतिक पर्यावरण दिनविशेष**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून दि. ५ जून २०२५ रोजी महाविद्यालयांमध्ये डॉ. उत्कर्ष घाटे (आंतरराष्ट्रीय व्याख्याते, महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड) यांचे ऑनलाईन पध्दतीने अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. हा दिवस पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी, निसर्ग संवर्धनासाठी आणि शाश्वत विकासासाठी नागरिक, शासन आणि उद्योग यांना प्रोत्साहन देण्यासाठी कसा महत्त्वाचा आहे व तो साजरा करण्यामागचे कारण डॉ. उत्कर्ष घाटे यांनी अतिशय मार्मिक शब्दात विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. डॉ. उत्कृर्ष घाटे यांनी विद्यार्थ्यांना झाडे लावा, निसर्गसंवर्धन करा, पाण्याचा वापर कमी करा आणि पाणी वाचवा, प्लास्टिकचा वापर कमी करा, स्थानिक पर्यावरण समूहांमध्ये सामील व्हा, तसेच जमिनीचे पुनरूज्जीवन करणारे उपक्रम राबवा असा

मोलाचा सल्लाही दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी केले. आभार प्रदर्शन आयक्यूएसी कोऑर्डिनेटर डॉ. स्वाती जोशी यांनी केले. या व्याख्यानास विद्यार्थी आणि शिक्षक वृंद ऑनलाईन पध्दतीने मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**आंतरराष्ट्रीय योग दिन :**

दि. २१ जून २०२५ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. सरिता साळुंखे (आयुर्वेद सल्लागार व योग प्रशिक्षक) उपस्थित होत्या. त्यांनी योगाचे शारीरिक, मानसिक व आत्मिक आरोग्यासाठी असलेले महत्त्व अधोरेखित केले तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी आणि शिक्षक वर्गामध्ये योगाभ्यासाची सवय लागावी यासाठी प्रत्यक्ष योगासने कशी करावीत याचे प्रात्यक्षिकही दिले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. रेखा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली शारीरिक शिक्षण संचालक श्री. विवेक झेंडे यांनी उत्तमरित्या पार पाडले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा तसेच शिक्षक वृंदांचा या कार्यक्रमास उस्फूर्त सहभाग लाभला.

**कोरीगड किल्ला ट्रेक**

दि. ५ जुलै २०२५ रोजी शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लोणावळ्याजवळील अंबरगाव येथील समुद्र सपाटीपासून सुमारे ३०२८ फूट उंचीवर असलेल्या कोरीगड किल्ल्याचा ट्रेक यशस्वीरित्या पूर्ण केला. इतिहास, निसर्ग आणि साहस यांचा संगम असलेल्या या ठिकाणी जाण्याचा निर्णय उपप्राचार्या सौ. रेखा जोशी यांनी घेतला. तसेच तो प्रत्यक्षात आणण्यासाठी शारीरिक शिक्षण संचालक श्री. विवेक झेंडे यांनी मौल्यवान योगदान दिले. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी ट्रेकमध्ये उत्साहाने सहभाग घेतलेल्या कर्मचारी वृंदाचे मनापासून अभिनंदन केले व भविष्यातही अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाईल याची ग्वाही दिली. या ट्रेकची माहिती, संपर्क, सुरक्षा आणि व्यवस्थापनात श्री. अक्षय करंदीकर (ऑपरेशन हेड, एडव्हेंचर मंत्रा प्रायव्हेट लिमिटेड), फ्रीलान्स इन्स्ट्रक्टर श्री. प्रवीण इंगवले आणि नैना सुहान यांचे अमूल्य सहकार्य मिळाले. या ट्रेकमध्ये एकूण ३४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. हा ट्रेक कर्मचाऱ्यांमध्ये एकात्मता, फिटनेस विषयी जागरूकतेचा अनुभव देणारा ठरला. ***

*** कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे ***



दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने करताना शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी



दि. ५ जुलै २०२५ रोजी कोरीगड किल्ल्यावर यशस्वी चढाई →

## कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्र. प्राचार्य : डॉ. मनोज तारांबळे**

**ई अँड टी सी इंजिनिअरिंग विभाग**

स्टुडंट्स असोसिएशन ने दि. ९ जुलै २०२५ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी विभागाचे माजी विद्यार्थी लेफ्टनंट समीर पालवे यांचे आर्मी मधील संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानामध्ये त्यांनी आर्मी मधील नोकरीच्या संधी तसेच विविध परीक्षांच्या तयारी याबद्दल मार्गदर्शन केले.

स्टुडंट्स असोसिएशनने दि. १० जुलै २०२५ रोजी 'गुरूपौर्णिमा' कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी गुरूपौर्णिमा का साजरी केली जाते या बद्दलची माहिती सांगितली. तसेच सर्व गुरूजनांचा सत्कार केला. काही विद्यार्थ्यांनी गुरूजनांच्या बद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी विभागप्रमुख डॉ. प्रसन्न शेटे आणि संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सौ. प्रिया देशपांडे आणि प्रा. निलेश कुचेकर यांनी आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी केले.

दि. १२ जुलै २०२५ रोजी क्लबच्या (टेडेक्स क्लब) सदस्यांचा सत्कार कार्यक्रम संपन्न झाला. या विशेष कार्यक्रमात संचालक श्री. सुनील रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, तसेच प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारंबळे यांच्या हस्ते क्लब सदस्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत फॅकल्टी कोऑर्डिनेटर प्रा. तनुजा खटावकर यांनी केले. संचालक श्री. सुनील रेडेकर, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, डॉ. एम. आर. तारंबळे यांनी, विद्यार्थ्यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, आयोजन, आणि कॅम्पसवर मान्यवरांना आमंत्रित करण्याची प्रक्रिया अत्यंत नेटकेपणाने पार पाडल्याचे कौतुक करत, या संपूर्ण प्रवासात त्यांना मिळालेल्या अनुभवात्मक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थी (TEDxlicensee) परवानाधारक अभिजीत थोरे याने उपस्थितांचे आभार मानले.

दि. १४ जुलै २०२५ रोजी ''अँटेना डिझाईन'' या विषयावरचे तज्ज्ञ सत्र विभाग आणि IEI Student Chapter यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते. डॉ. वाय. बी. ठाकरे यांनी घेतलेल्या सत्रात विद्यार्थ्यांना अँटेना डिझाईनचे बेसिक्स, रेडिएशन पॅटर्न, इम्पीडन्स मॅचिंग आणि प्रत्यक्ष उपयोग समजावून सांगितले. या कार्यक्रमाचे कोऑर्डिनेटर IEI फॅकल्टी डॉ. वाय. बी. ठाकरे आणि प्रा. दिप्ती वर्पे या होत्या.

दि. ११ जुलै २०२५ रोजी विभाग आणि IEI Student Chapter यांच्या संयुक्त विद्यमाने द्वितीय आणि तृतीय वर्गातील विद्यार्थ्यांसाठी ''ऑटोमेशन, IoT, इंडस्ट्री ४.० आणि करिअर संधी'' या विषयावर व्याख्याते श्री. श्रीकांत बिडवाई यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी ऑटोमेशनमधील नवीन ट्रेंड्स, IoT ब्लॉक डायग्राम, विविध रिअल-वर्ल्ड ॲप्लिकेशन्स, ThingSpeak, DHT11, Raspberry Pi यांची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच करिअर मार्गदर्शनही प्रभावीपणे केले.

दि. १८ जुलै २०२५ रोजी विभाग व IEI Student Chapter यांच्या वतीने द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांसाठी ''Lab VIEW आणि त्याचा ऑटोमेशनमधील उपयोग'' या विषयावर डॉ. राहुल पोल यांचे हँड्स-ऑन सत्राचे आयोजन करण्यात आले. त्यांनी Lab VIEW चा ग्राफिकल इंटरफेस, सेन्सर इंटिग्रेशन, डेटा ॲक्विझिशन, तसेच त्याचा ऑटोमेशन क्षेत्रातील वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रात्यक्षिके दाखवून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देण्यावर भर दिला. या कार्यक्रमाचे कोऑर्डिनेटर IEI फॅकल्टी

डॉ. वाय. बी. ठाकरे आणि प्रा. दिप्ती वर्पे या होत्या.

विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये फॅकल्टी ओरिएंटेशन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत संबंधित विषयांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांचे सत्र पार पडले. सहभागी प्राध्यापकांना विषयाचे अद्ययावत ज्ञान तसेच अध्यापन कौशल्ये विकसित करण्याची सुवर्णसंधी या माध्यमातून उपलब्ध झाली. खालीलप्रमाणे वेळापत्रकानुसार संबंधित प्राध्यापकांनी कार्यशाळेस उपस्थिती लावली.

दि. ९ जुलै २०२५ टी.एस.एस.एम.एस (PVPIT), बावधन, पुणे, डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स विषयाकरिता प्रा. एन. डी. कुचेकर व प्रा. यू. ए. वाळके

दि. ११ जुलै २०२५ ट्रिनिटी ॲकेडेमी ऑफ इंजिनिअरिंग, पुणे, विषय इलेक्ट्रॉनिक सर्किट्स रिसोर्स पर्सन - डॉ. पी. जी. शेटे, उपस्थित फॅकल्टी सदस्य - प्रा. ए. एस. नजन, प्रा. के. सी. वांझरे

दि. १२ जुलै २०२५ Data Strucutre & Algorithms (online) प्रा. एम. पी. पोतदार, प्रा. व्ही. व्ही. सोवनी सहभागी होते. वरील सर्व प्राध्यापकांनी कार्यशाळांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवून त्या विषयातील सखोल ज्ञान प्राप्त केले असून, अध्यापनामध्ये गुणवत्ता साधण्याच्या दृष्टीने हे मार्गदर्शन अत्यंत उपयुक्त ठरले आहे.

### इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी विभाग

शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ बॅचच्या अंतिमवर्षातील विद्यार्थ्यांसाठी विभागाने विधित टेक्नॉलॉजीज प्रायव्हेट लिमिटेडच्या सहकार्याने ''कॅम्पस टू कॉर्पोरेट''हा कार्यक्रम दि. ३ ते १२ जुलै २०२५ पर्यंत ऑफलाइन पद्धतीने आणि दि. २५ जुलै २०२५ पर्यंत ऑनलाइन पद्धतीने आयोजित केला होता. विद्यार्थ्यांना संपूर्ण प्लेसमेंट प्रक्रिया कशी होते याची माहिती करून देण्यासाठी दि. २६ जुलै २०२५ रोजी एक 'मॉक ड्राइव्ह' आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश कॅम्पसमध्ये शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमातील आणि कॉर्पोरेट नियुक्त्यांच्या वास्तविक-वेळेच्या अपेक्षांमधील अंतर भरून काढणे हा होता. विद्यार्थ्यांना १५ ते २० वर्षांच्या विस्तृत कारकिर्दीतील तांत्रिक उद्योग तज्ज्ञांकडून डेटा स्ट्रक्चर्स, नेटवर्किंग, ऑपरेटिंग सिस्टम्स, एडीबीएमएस आणि यासारखे महत्त्वाचे विषय शिकण्याची संधी मिळाली. आयआयएम आणि पीएचडी तज्ज्ञांकडून रिज्युमे बनवणे, वैयक्तिक मुलाखतींना सामोरे जाणे, गट चर्चा करणे यासारख्या सॉफ्ट स्किल्स यांची माहिती दिली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या प्लेसमेंटसाठी सर्वांगीण दृष्टिकोनातून तयारी करण्यास मदत करेल.

### इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग

* सन २०२४-२५ या वर्षांमध्ये, जुलै महिन्यात अंतिम वर्षातील ६ विद्यार्थ्यांना ग्रीन एन सोल्युशन्स या कंपनीमध्ये नोकरीची संधी मिळाली. यामुळे विद्युत विभागातील ६० विद्यार्थ्यांच्या एका वर्गामधील एकूण प्लेसमेंट ४६ झाल्या.

* विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी सोमवार दि. २३ जून २५ रोजी ''क्लीन एनर्जी टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट'' या इंटरनॅशल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅममध्ये 'सस्टेनेबल क्लीन रिन्यूएबल कोजनरेशन सिस्टिम्स' या विषयावर की नोट सेशन घेतले. हा फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम दि. २३ ते २८ जून २०२५ दरम्यान लोकनेते गोपीनाथजी मुंडे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अँड रिसर्च, नाशिक यांनी आयोजित केला होता.

* दि. १६ जुलै २०२५ रोजी प्रोग्रेशन स्कूल या कंपनीच्या सहकार्याने आयोजित केलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अवेअरनेस उपक्रमाअंतर्गत अंतिम वर्षातील ४५ विद्यार्थ्यांनी Agentic AI या विषयावरील कार्यशाळेत सहभाग घेतला.

* दि. १८ जुलै २०२५ रोजी प्रोग्रेशन स्कूल या कंपनीच्या सहकार्याने आयोजित आर्टिफिशियल इंटेलिजन्स अवेअरनेस उपक्रमाअंतर्गत द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या ९३ विद्यार्थ्यांनी या विषयावरील कार्यशाळेत सहभाग घेतला.

✲ दि. २१ ते २३ जुलै २०२५ या कालावधीत आयबीएम कंपनीच्या सीएसआर फंडिंग स्कीम तर्फे आयोजित कार्यशाळेत द्वितीय वर्षातील ३७ विद्यार्थ्यांनी ३ दिवसीय 'क्लाऊड कॉम्प्युटिंग अँड आयबीएम क्लाऊड सर्व्हिसेस' या कार्यशाळेत भाग घेतला.

✲ विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी दि १७ जुलै २०२५ रोजी तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ''Plagiarism and Ethics in Technical Communication : Concept to Confident Report'' या विषयावर व्याख्यान घेतले

**मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग**

**अभिनंदनीय**

✲ मेकॅनिकल विभागाच्या संशोधन केंद्रामार्फत प्रा. डी. एस. पाटील, (महाविद्यालयाचे रजिस्ट्रार) यांनी डॉ. मनमोहन भूमकर यांच्या मार्गदर्शनाखाली व डॉ. प्रवीण कुलकर्णी यांच्या सहमार्गदर्शनाखाली पीएच.डी. पूर्ण केली आहे.

✲ महाविद्यालयाला आयआयटी बॉम्बे येथे दि. १९ जुलै २०२५ रोजी शनिवारी आयोजित SPOC सन्मान कार्यक्रमात दोन प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १) एनपीटीईएल कोर्सेससाठी विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येने नोंदणी केल्याबद्दल 'ॲस्पिरंट पुरस्कार' प्रदान करण्यात आला. २) एनपीटीईएल नोंदणीसाठी विद्यार्थ्यांमध्ये आणि कर्मचाऱ्यांमध्ये उत्तम समन्वय आणि प्रयत्नांसाठी प्रो. संकेत एस. चिक्षे यांना 'ॲक्टिव्ह SPOC पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले.

**गुरूपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन**

दि. १७ जुलै २०२५ रोजी स्टुडंट असोसिएशनच्या वतीने गुरूपौर्णिमेनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी डॉ. सुजाता रिसबूड प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व विशद केले.

**पालक - शिक्षक सभा**

दि. १३ जुलै २०२५ रोजी द्वितीय, तृतीय व अंतिम वर्ष अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या पालक-शिक्षक बैठक घेण्यात आल्या.

**कार्यशाळेचे आयोजन**

दि. १८ जुलै २०२५ रोजी महाविद्यालयाच्या वतीने Agentic AI कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये द्वितीय व तृतीय वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कृत्रिम बुद्धिमत्तेतील नवीन संकल्पना या कार्यशाळेत मांडण्यात आल्या.

दि. २ आणि ३ जुलै २०२५ रोजी विभागात AMCAT चाचणी तृतीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या वेळेत आयोजित करण्यात आली होती. या उपक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ. एन. जी. जयस्वाल आणि प्रा. एम. एम. कांबळे यांनी केले.

**प्रिंटिंग इंजिनिअरिंग विभाग**

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सातारा जिल्ह्यामधील फ्लेक्सोग्राफी कंपनीमध्ये काम करणाऱ्या दहा सेवकांसाठी तीन दिवसांचे वर्कशॉप आयोजित केले होते. या वर्कशॉप दरम्यान उपस्थित सेवकांना थिअरी व प्रॅक्टिकलचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रो. अमित कुमार रेढू यांनी या वर्कशॉपचे नियोजन केले होते.

प्रो. वर्षा चावरे यांनी द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले होते. त्यामध्ये माजी विद्यार्थी श्री. पवन खके (२०१६ बॅच) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी बीआरसी-इस्कॉन इ. ५ वी च्या महाभारत पुस्तकातील सर्व प्रकरणांसाठी खेळ, प्रश्नमंजुषा आणि वेगवेगळ्या व्यायाम प्रकारांची कलात्मक रचना केली. या प्रकल्पाचे बीआरसीने कौतुक केले.

प्रो. श्रीकला कानडे यांना मुंबई मुद्रक संघ आयोजित डिजिटल राऊंड टेबल अँड इंटरनॅशनल कॉन्फरन्स २०२५ कोलंबो, श्रीलंका येथे आमंत्रित करण्यात आले होते. या तीन दिवसीय कॉन्फरन्स मध्ये अनेक नवीन विषयांवर चर्चा झाली. भारत आणि श्रीलंका यांच्यामध्ये व्यवसाय, तंत्रज्ञान, आणि प्रशिक्षण यातील दुवा साधण्यासाठी मुंबईमध्ये मुद्रक संघ आणि श्रीलंका असोसिएशन ऑफ प्रिंटर्स यांच्यामध्ये MOU करण्यात आला. यामुळे विभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी भविष्यात अनेक नवीन संधी उपलब्ध होणार आहेत.

प्रो. मधुरा महाजन यांनी चेन्नईमध्ये भरलेल्या प्रिंट एक्सपो २०२५ मध्ये Girls who Print या इंटरनॅशनल फोरमला रिप्रेझेंट केले. प्रो. मधुरा महाजन या Girls who Print या इंटरनॅशनल फोरमच्या इंडियाच्या प्रमुख आहेत.

पुणे प्रेस ओनर्स असोसिएशन तर्फे कु. सौरव वानखेडे, द्वितीय वर्ष, कु. सिद्धी दहीतुळे आणि कु. कोमल चिट्टे, तृतीय वर्ष आणि कु. सौरव वाकडे अंतिम वर्ष या प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.

### प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग

मूल्यशिक्षण कक्षाने दि. ३० जून २०२५ रोजी विद्यापीठातील शिक्षकांसाठी एक दिवसीय प्राध्यापक अभिमुखता कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी ९५ सहभागींनी नोंदणी केली होती.

दि. २१ जुलै २०२५ रोजी अभियांत्रिकी विज्ञान आणि मानव्यविद्या विभागातील प्राध्यापकांसाठी स्कोपस ओरिएंटेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये संशोधन समन्वयक डॉ. सचिन सूर्यवंशी यांनी संस्थेच्या स्वायत्ततेच्या दृष्टिकोनातून NIRF चे महत्त्व देखील सांगितले.

दि. २४ जुलै २०२५ रोजी NPTEL महाविद्यालयाच्या मेकॅनिकल विभागाचे समन्वयक प्रा. संकेत चिक्षे यांनी प्रथम वर्षाच्या सर्व शिक्षकांना ''स्वयं-शिक्षण सुविधा'' या विषयावर मार्गदर्शन केले. या बैठकीचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थी आणि प्राध्यापकांमध्ये स्वयं-शिक्षणासाठी एक व्यासपीठ म्हणून NPTEL बद्दल जागरूकता, ऑनलाइन प्रमाणन अभ्यासक्रमांचे महत्त्व, संस्थात्मक आणि विभागीय उत्कृष्टतेच्या दृष्टिकोनातून NBA आणि NAAC कडून अशा उपक्रमांची भूमिका हे होते.

### ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट

ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागामार्फत विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट इंडस्ट्रीसाठी सज्ज करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये रिझ्युमे रायटिंग, व्हिडीओ प्रोफाइलिंग, ग्रुप डिस्कशन व मॉक इंटरव्ह्यूजचे आयोजन करण्यात आले.

जे विद्यार्थी अ‍ॅटलास कॉप्कोच्या प्लेसमेंटसाठी निवडले गेले होते, त्यांच्यासाठी इंटरव्ह्यू व ग्रुप डिस्कशनचा विशेष सराव करून घेतला गेला.

एनकॉन, विषय कॉम्पोनंट्स, फिनोलेक्स केबल्स, टाटा ऑटो कॉम्पोनंट्स, सिम्प्ट्रॉनिक्स, याझाकी लिमिटेड इ. प्रतिष्ठित कंपन्यांनी अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी दिल्या.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये आज अखेर पर्यंत एकूण सुमारे ३६० विद्यार्थ्यांची कॅम्पस रिक्रुटमेंट झाली आहे.

IBM CSR फंडिंगअंतर्गत IBM Cloud Platform विषयी जागरूकता मिळावी म्हणून Edunet Foundation तर्फे तीन दिवसांचे प्रात्यक्षिक शिबिर आयोजित करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांचे आयोजन श्री. अविनाश पोरे, प्रा. डॉ. पायल तायडे व प्रा. डॉ. एन. जी. जयस्वाल, प्रा. रमेश खिस्ते यांनी केले. प्रा. निखिल लिमये आणि प्रा. दिप्ती पुजारी यांनी सराव सत्रे घेऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवला.

## स्पोर्ट्स विभाग

दि. २१ जून २०२५ रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन ''भक्ती योग'' या संकल्पनेतून घोरपडी पेठ, पुणे येथे सकाळी ७:३० ते ९:०० या वेळेत वारकऱ्यांसमवेत साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या अंतर्गत विद्यापीठाने एकूण पाच दिंड्यांची जबाबदारी आपल्या महाविद्यालयास दिली होती. यामध्ये ४०० वारकरी २० प्राध्यापक - कर्मचारी आणि १८ विद्यार्थी सहभागी झाले होते. सहभागी वारकऱ्यांसह इतर वारकरी विद्यार्थी आणि प्राध्यापकांना नेहरू टोपी वाटप केले. शारीरिक शिक्षण संचालक डॉ. नामदेव बन्ने यांनी योगाचे प्रात्यक्षिक करून घेतले, तसेच कार्यक्रमाधिकारी प्रा. उदय सरोदे आणि प्रा. आनंद नजण यांनी या कार्यक्रमाची जबाबदारी पार पडली.

***

*** संस्था मुख्यालय, पुणे ***



दि. ६ एप्रिल २०२५ रोजी श्रीरामनवमीनिमित्त गीता भगिनींनी संपूर्ण गीता पठणाचा कार्यक्रम केला. यानिमित्त प्रातिनिधिक स्वरूपात गीता भगिनी सौ. ममता बिपीन कुलकर्णी यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त करताना संचालक श्री. सुनील रेडेकर

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### आंतरराष्ट्रीय योग दिन

'योग म्हणजे शरीरालाच नाही तर मनाला देखील शांत आणि संयत ठेवण्याचा एक अभ्यास.' आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून दि. २० जून २०२५ रोजी वेगवेगळी योगासने करून योग दिन साजरा केला. विद्यार्थ्यांना अप्पासाहेब गरगटे सभागृहात नेण्यात आले होते. श्रीमती मोनालर माने आणि श्रीमती प्रणिती सावंत यांनी विद्यार्थ्यांना वेगवेगळी योगासने करून दाखवली. योग म्हणजे केवळ व्यायाम नाही तर ती एक जीवनशैली आहे. हे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. ताडासन, त्रिकोणासन, व इतर आसने तसेच भ्रामरी आदी योग मुद्राही विद्यार्थ्यांकडून करवून घेतल्या.

### नर्सरीच्या चिमुकल्यांचा पहिला दिवस

शाळा, उत्तम संस्काराचे माहेर घर, शाळा ज्ञानाचं भांडार, अज्ञानातून काढती बाहेर जीवन विद्येचे हे द्वार....

सोमवार दि. २३ जून २०२५ हा दिवस सुवर्ण अक्षरात लिहावा असा शुभ दिवस. या दिवशी विद्यार्थ्यांच्या चिमुकल्या पावलांनी शाळेला नाविन्यपूर्ण चैतन्य प्राप्त झाले. पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागात नर्सरी वर्ग सुरू करण्यात आला. हा दिवस अगदी उत्साही व आनंदाचा दिवस होता. नवीन विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या मुख्यद्वारा जवळ रांगोळी, फुग्यांची सजावट, तसेच फुलांची सजावट केली होती. वर्गामध्ये फुगे, मिकी माऊस इत्यादी साहित्याद्वारे सजावट करण्यात आली होती. शाळेच्या मुख्य द्वाराजवळ कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, सर्व विभागाचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व शिक्षक यांनी मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण केले. सर्वांनी केक कापून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे व समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांनी पालकांशी सुसंवाद साधला. तसेच विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाची ग्वाही दिली. विद्यार्थ्यांना केक देण्यात आला. घरी जाताना विद्यार्थ्यांनी व पालकांनी सजवलेल्या सेल्फी पॉईंटवर छान सेल्फी काढण्याचा आनंद लुटला.

### आषाढी एकादशी

**'अवघी ही पंढरी वैष्णवांचा मेळा,**
**पाहतो मी आता याची देही याची डोळा...'**

दि. ४ जुलै २०२५ रोजी पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी मोठ्या आनंदात व उत्साहात साजरी केली. यावेळी मोठ्या शिशु वर्गाच्या विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या वेशभूषा धारण केल्या होत्या. विठ्ठल रखुमाई, संत जनाबाई, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत रामदास स्वामी, संत एकनाथ, संत तुकाराम, गोरा कुंभार अशी अनेक संत मंडळी विद्यार्थ्यांनी साकारली. तसेच बाकीच्या विद्यार्थ्यांनी 'आपली संस्कृती, आपली परंपरा' या उक्तीला साजेल अशी पारंपरिक वेशभूषा- 'कपाळी टिळा, गळ्यात माळ व हातात टाळ' केली होती. अप्पासाहेब गरगटे सभागृहामध्ये वारीचे रिंगण धरण्यात आले. यावेळी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव व सर्व विभागाचे मुख्याध्यापक यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून आरती करण्यात आली. श्रीमती नेहा कर्णिक यांनी महाराष्ट्राची भक्ती परंपरा व वारकरी संप्रदायाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले व विद्यार्थ्यांना चांगदेव महाराजांना चालत्या भिंतीवरून भेटावयास निघालेली ज्ञानेश्वरादी भावंडे यांची कथा सांगितली. सर्व शिक्षकांनी फुगड्यांचा फेर धरला. शेवटी शाळेच्या आवारात पालखीची ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल, विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' या नामघोषात मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांना लाडवाचा प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

**गुरूपौर्णिमा**

''ना वयाचे बंधन... ना नात्याची जोड... ज्याला आहे अगाध ज्ञान, जो देई हे निःस्वार्थ दान, गुरू त्यासी मानावा, देव तेथेची जाणावा... ''

गुरुवार दि. १० जुलै २०२५ रोजी अप्पासाहेब गरगटे सभागृहात गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव व तसेच सर्व शिक्षक वृंद यांनी प्रथम महर्षी व्यास ऋषींच्या प्रतिमेचे पूजन केले. श्रीमती मोनाली माने यांनी गुरू रामकृष्ण परमहंस व शिष्य स्वामी विवेकनंद यांची गोष्ट सांगून गुरू शिष्याचे नाते विशद केले. तसेच मोठाशिशु वर्गातल्या विद्यार्थ्यांनी खरा गुरू अवघड परिस्थितीमध्ये आपल्या शिष्याला साथ देतो, याचे नाट्यरूपी अप्रतिम सादरीकरण केले. मोठा शिशु वर्गातल्या मुलांनी गुरू विषयी आपले मनोगत व्यक्त केले. सर्व विद्यार्थ्यांनी व्यास ऋषींच्या प्रतिमेला वंदन केले.

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु, गरूर्देवो महेश्वरा, गरूः साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः, श्लोक म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिन अत्यंत उत्साहात आणि ऊर्जेने साजरा केला!

शाळेची माजी विद्यार्थिनी आणि आता आमच्या टीमच्या सदस्य असलेल्या श्रीमती जयालक्ष्मी भट यांनी सत्राचे नेतृत्त्व करून छोट्या योगींना सूर्यनमस्काराचे मार्गदर्शन केले.

**आषाढी एकादशी उत्सव**

छोट्या आणि मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीचा सण मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरा केला.

विठू माऊली, रुक्मिणीदेवी आणि वारकरी यांच्या वेशात सजून, या छोट्या भक्तांनी सुंदर सजवलेले तुळशीवृंदावन वाहून नेले, पालखी मिरवणूक काढली आणि ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' च्या गोड गजरात सहभागी झाले. सर्व विद्यार्थ्यांना राजगिऱ्याच्या लाडूचा प्रसाद देण्यात आला.

**गुरूपौर्णिमा उत्सव**

शिक्षकांविषयी कृतज्ञता व आदरभाव व्यक्त करत गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी केली.

मोठ्या शिशुच्या विद्यार्थ्यांनी गुरू द्रोणाचार्य आणि एकलव्य यांच्या कथेमधून एक विचारप्रवृत्त नाटिका सादर केली. या नाटिकेमधून गुरूंच्या प्रति खरी निष्ठा आणि निःस्सीम आदर या मूल्यांचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. छोट्या विद्यार्थी कलाकारांनी आपल्या आत्मविश्वासाने प्रेक्षकांची मनं जिंकली.

यानंतर 'गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु' या भक्तिपूर्ण श्लोकावर सुंदर समूह नृत्य सादर करण्यात आले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. महिला पतंजली योग समिती मुंबई आणि पुणे विद्यार्थी गृह विद्याभवन संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने प्राथमिक मराठी विभागात इ. १ली ते इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी योग दिवस विविध आसने आणि प्राणायाम करून साजरा केला.

महिला पतंजली योग समितीच्या साधक श्रीमती मृदुला गुप्ता आणि श्रीमती काणेकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून दिले व विद्यार्थ्यांकडून उपयुक्त अशी योगासने करून घेतली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी उपस्थित पतंजली योग समितीच्या साधकांचे स्वागत केले व आभार मानले.

**पालकसभा २०२५-२६**

मंगळवार दि. २४ जून २०२५ रोजी इ. १ली व इ. २री च्या पालकसभा घेण्यात आल्या. तसेच गुरुवार दि. २६ जून .२०२५ रोजी इ. ३री व इ. ४थी च्या पालकसभा घेण्यात आल्या.

या पालकसभांमध्ये पालकांना शाळेत होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. शाळेची वेळ, पाठ्यपुस्तके, शालेय शिस्त, अभ्यास, परीक्षा, विविध स्पर्धा, सहशालेय उपक्रम, स्पर्धा परीक्षा यावर चर्चा करण्यात आली.

**सेवापूर्ती सोहळा**

शिक्षिका श्रीमती प्राजक्ता प्रकाश वराडकर या १६ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सोमवार दि. ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाल्या. शिक्षण क्षेत्रात त्यांची एकूण ३६ वर्षे सेवा झाली. सन २००९ मध्ये त्या मुलुंडच्या लोकमान्य शाळेतून विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत रुजू झाल्या. त्या एक आदर्श शिक्षिका, सुंदर हस्ताक्षर असलेल्या, शांत स्वभाव असलेल्या, सर्वांशी मिळून राहणाऱ्या, विद्यार्थी प्रिय अशा शिक्षिका होत्या. या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव, मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे व प्राथमिक इंग्रजी, पूर्व प्राथमिक मराठी व इंग्रजी माध्यमातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या पुढील भावी आयुष्यासाठी खूप साऱ्या शुभेच्छा!

**आषाढी एकादशी सोहळा**

आषाढ महिन्यातील एकादशीला फार पवित्र मानण्यात येते म्हणून या एकादशीला महा एकादशी म्हणतात. शनिवार दि. ५ जुलै २०२५ रोजी दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, पालक शिक्षक संघ, शाळा व्यवस्थापन समिती पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते विठुरायाच्या पालखीचे पूजन करण्यात आले.

या प्रसंगी विद्यार्थी विविध संतांच्या वेशभूषेत आले होते. 'ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' या ठेक्यावर विद्यार्थ्यांनी ताल धरला. गोल रिंगण करून मुलांनी वारकरी नृत्य केले. शाळेच्या परिसरात 'जयहरी विठ्ठलाचा' जयघोष करीत विद्यार्थ्यांनी दिंडी काढली. सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शिक्षकांनी दिंडीत उत्साहाने सहभाग घेतला.

**गुरूपौर्णिमा**

आपल्या भारतीय संस्कृतीत गुरूला मोठे स्थान आहे. आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरू पौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. गुरुवार दि. १० जुलै २०२५ रोजी गरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली.

याप्रसंगी इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी गुरू पौर्णिमेसंबंधी माहिती, कविता, गोष्टी, गाणी सादर केली. विद्यार्थ्यांनी गुरूविषयी असलेल्या आपल्या भावना व्यक्त केल्या.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

**महाराष्ट्र शिक्षाभूषण पुरस्कार २०२५ - सन्माननीय गौरव**

दि. ३ जून २०२५ रोजी IDYM Foundation आणि ISRO यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र शिक्षाभूषण पुरस्कार २०२५' हा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा U.B.S. College of Education Auditorium, भांडूप (प) मुंबई येथे पार पडला.

या सोहळ्यात मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक योगदानाबद्दल 'महाराष्ट्र शिक्षाभूषण पुरस्कार २०२५' देऊन गौरवण्यात आले. श्रीमती अनघा सावंत यांनी शैक्षणिक नवकल्पना, विद्यार्थी केंद्रित उपक्रम व

शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी घेतलेल्या मेहनतीची दखल घेऊन त्यांना या सन्मानाने गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला अनेक मान्यवर, शिक्षक व शैक्षणिक संस्था प्रमुख उपस्थित होते.

**इ. १ली एन. ई. पी. २०२० अंतर्गत नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एन. ई. पी. २०२०) अंतर्गत इ. १ली च्या नवीन अभ्यासक्रमानुसार शिक्षकांना मार्गदर्शन करण्यासाठी शासनामार्फत दि. १२ ते १४ जून २०२५ या कालावधीत तीन दिवसीय प्रशिक्षण जयंतीलाल म्युन्सिपल स्कूल, घाटकोपर (प), मुंबई येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये श्रीमती स्वप्ना गायकवाड व श्रीमती मयुरी कदम यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणात नवीन अभ्यासक्रमाची रचना, मुलभूत साक्षरता व अंकज्ञान, कृतीआधारित व खेळावर आधारित शिक्षण, मातृभाषेचा उपयोग, मूल्याधारित शिक्षण आणि मूल्यांकन पद्धती याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणात तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विविध कार्यशाळा, चर्चा व प्रत्यक्ष कृतींच्या माध्यमातून अध्यापन कौशल्ये विकसित करण्यावर भर दिला. दोन्ही शिक्षिकांनी प्रशिक्षण काळात मिळालेल्या अनुभवातून नवीन अभ्यासक्रम अंमलात आणण्यासाठी आवश्यक ते ज्ञान आत्मसात केले.

**शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मोफत पाठ्यपुस्तक वितरण**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या सुरूवातीला, सोमवार दि. १६ जून २०२५ रोजी नव्या वर्षाचा पहिला दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी शासनामार्फत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले.

इ. १ली ते ४थी या सर्व वर्गांतील विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या योजनेंतर्गत या पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या वर्गानुसार पुस्तकांचा संपूर्ण संच देण्यात आला. पुस्तके शाळेच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने नियोजित पद्धतीने वाटप करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक साधनांची सोय झाली असून त्यांच्या पालकांवरील आर्थिक भार कमी होण्यास मदत झाली. हा उपक्रम शासनाच्या 'सर्व शिक्षित-सर्व सशक्त' या उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले एक सकारात्मक पाऊल ठरले.

**आंतरराष्ट्रीय योग दिन**

शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.

'योग म्हणजे केवळ व्यायाम नव्हे, तर एक जीवनशैली आहे' या विचाराने प्रेरित होऊन, विद्यार्थ्यांमध्ये योगाची जाणीव आणि सवय लावण्यासाठी विविध वर्गांसाठी विशेष योग सत्रांचे आयोजन करण्यात आले होते.

क्रीडांगणावर आयोजित या विशेष कार्यक्रमात इ. ३री आणि ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी दोन तज्ज्ञ योग शिक्षिका उपस्थित होत्या.

इ. १ली व २री च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गशिक्षकांनीच मार्गदर्शन करून, वर्गातच योगाचे महत्त्व पटवून देत सोपी योगासने करून घेतली.

**पालक-शिक्षक सभा**

पालक-शिक्षक संबंध अधिक दृढ होण्यासाठी, तसेच शाळेच्या शैक्षणिक, सहशालेय आणि प्रशासकीय बाबींची सखोल माहिती पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी पालक-शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती.

दि. २३ जून २०२५ रोजी इ. ३री-४थी व दि. २५ जून २०२५ रोजी इ. १ली-२री ची पालक-शिक्षक सभा घेण्यात आली. या सभेची सुरूवात प्रास्ताविक व

स्वागतपर भाषणाने झाली. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी शाळेचे शैक्षणिक धोरण, नियम, कार्यपद्धती आणि यावर्षीच्या शैक्षणिक उद्दिष्टांविषयी पालकांशी संवाद साधला. विशेषतः इ.१ली च्या पालकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एन.ई.पी २०२०) नुसार पाठ्यपुस्तकांमध्ये व अभ्यासक्रमात झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांची सविस्तर माहिती देण्यात आली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या वार्षिक मूल्यमापनाच्या पद्धती, घेतल्या जाणाऱ्या नियमित चाचण्या, तसेच विद्यार्थ्यांमध्ये आवश्यक असलेले शिस्त, वेळेचे नियोजन, गृहपाठ वेळेवर पूर्ण करणे, पालकांचा सहभाग याविषयी सविस्तर माहिती दिली. पालकांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत सहकार्याची ग्वाही दिली.

या सभेमध्ये शाळेतील क्रीडा आणि संगीत अकादमी विषयी देखील माहिती देण्यात आली. श्री. सोनेश झोरे यांनी क्रीडा व संगीताचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात कसा उपयोग होतो या विषयी अतिशय प्रभावी मार्गदर्शन केले. सभेच्या शेवटी PTA (पालक-शिक्षक संघ) व SMC (शाळा व्यवस्थापन समिती) सदस्यांची निवड इयत्ता व तुकडीनुसार करण्यात आली.

### अभिनंदन वार्ता

सहा. शिक्षिका श्रीमती स्वप्ना दत्तात्रय गायकवाड यांना ''बी द चेंज फाउंडेशन'' तर्फे दि. २९ जून २०२५ रोजी 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. श्रीमती स्वप्ना गायकवाड यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!

### आषाढी एकादशी - पंढरपूर वारी उत्साहात साजरी

आषाढी एकादशी आणि पंढरपूर वारीचा उत्सव भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे तसेच के.सी.शाह, शाह आणि अँकर महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी वारीचे आणि आषाढी एकादशीचे सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व सांगणारी भाषणे केली. अप्पासाहेब गरगटे सभागृहात 'संतमय महाराष्ट्र' साकारल्यासारखे वाटत होते. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ महाराज, समर्थ रामदास आणि चक्रधर स्वामी यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी समता, न्याय, भक्ती आणि सद्वर्तनाचे धडे दिले. इ. ४थीच्या सर्व विद्यार्थ्यांनी ''विठू माऊली तू माऊली जगाची, माऊलीत मूर्ती विठ्ठलाची...'' हे भक्तिगीत गायले. श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक केले.

इ. १ली व इ. २रीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठलाचे चित्र रंगवले. सर्व विद्यार्थ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इ. ४थीच्या वर्गशिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर, श्रीमती स्नेहा राणे आणि श्री. दीपक निचित यांनी विशेष मेहनत घेतली.

### विद्यार्थ्यांना लोकशाही प्रक्रियेचा अनुभव-हेड बॉय आणि हेड गर्ल निवडणूक

दि. ८ जुलै २०२५ रोजी इ. ३री आणि ४थी च्या विद्यार्थ्यांसाठी हेड बॉय आणि हेड गर्ल निवडणूक आयोजित करण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना लोकशाही प्रणालीची जाणीव करून देणे, तसेच त्यांना निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्प्यांचा प्रत्यक्ष अनुभव देणे हा होता.

मतदान प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय पद्धतीने व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. विद्यार्थ्यांनी आपापल्या मतदार यादीनुसार मतदान केंद्रावर जाऊन आपले मत नोंदवले. मतपेटी, ओळखपत्र, मतदान यादी अशा सर्व बाबींचा वापर करून निवडणूक अधिक वास्तवदर्शी आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली.

### गुरूपौर्णिमा उत्सव

'गुरू म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाणारा दीपस्तंभ' 'A teacher takes a hand, opens a mind, and touches a heart.' दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा हा सण साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरूवात विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली गुरूपूजनाने केली. इ. १ली व २री च्या विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गांमध्ये गुरूंची महती सांगणारे गाणे गायले, हस्तकला व फुलांनी वर्ग सजवले व त्यांच्या शिक्षकांचा आदरपूर्वक सत्कार केला.

शाळेच्या सभागृहात इ. ३री व ४थी च्या विद्यार्थ्यांनी एक सुंदर सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. भाषण, नृत्य आणि नाटकाच्या माध्यमातून 'गुरू-शिष्य परंपरा' प्रभावीपणे मांडण्यात आली.

या कार्यक्रमास समन्वयिका श्रीमती शुभांगी जाधव यांची विशेष उपस्थिती होती. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करत गुरूपौर्णिमेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी आपल्या मनोगतात 'गुरू हा केवळ शिक्षक नसून, तो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणारा मार्गदर्शक असतो.' 'Let us always be grateful to the torchbearers of knowledge' असे सांगितले.

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### NMMS शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५

भारत सरकार तर्फे इ. ८वी तील राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या NMMS २०२४-२५ या शिष्यवृत्ती परीक्षेत (सेमी इंग्रजी) विभागातील एकूण ९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची नावे :

कु. वाघमारे तनिष विनोद, कु. गोटम हर्ष मंगेश, कु. पवार पार्थ संजय, कु. कदम कार्तिक सोपान, कु. कांबळे यशस्वी सत्यम, कु. ढोलम नीरज विनायक, कु. ससाणे आकांक्षा संगम, कु. गांगरकर त्रिशा राजेश, कु. सावंत आर्या विलास

### गणित / विज्ञान ऑलिंपियाड परीक्षा

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ गणित ऑलिंपियाडला एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी कु. आर्या अमोल हांडे या विद्यार्थिनीने सुवर्ण पदक प्राप्त केले.

विज्ञान ऑलिंपियाड ला एकूण १० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी कु. ईश्वरी श्रीधर एरंडे या विद्यार्थिनीने सुवर्ण पदक प्राप्त केले, कु. अथर्व संजय कोयमहाले या विद्यार्थ्याने रौप्य पदक प्राप्त केले व कु. युगंधरा तुषार तोत्रे या विद्यार्थिनीने कांस्य पदक प्राप्त केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!**

### आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. २१ जून २०२५ रोजी प्रशालेत 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थ्यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके केली.

याप्रसंगी योगप्रशिक्षिका श्रीमती विनया कामत व श्रीमती जयश्री करंजकर यांना प्रशालेत आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी प्रशालेच्या मैदानावर विद्यार्थ्यांना विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यानुसार इ. ७वी च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सूर्यनमस्कार, ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन अशी विविध योगासने केली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना योग दिनाचे व योगासनाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांकडून श्वासाचे व्यायामही करून घेतले.

### पालकसभा २०२५-२६

दि. २१ जून ते २७ जून २०२५ या कालावधीत इ. ५वी ते १०वी च्या वर्गांच्या पालकसभा घेण्यात आल्या.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार यांनी इ.१०वी च्या निकाल आणि सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन केले. शाळेची शिस्त, शाळेत राबवत असलेले विविध उपक्रम यांबाबत माहिती सांगत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचना दिल्या.

यानंतर वर्ग शिक्षकांनी व्हीबी ॲप, स्कॉलरशिप परीक्षा, स्पर्धा परीक्षा, स्वच्छता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अभ्यास, दप्तराचे ओझे, दैनंदिनी, गणवेश, क्रीडास्पर्धा, विविध उपक्रम यांची माहिती दिली.

मागील वर्षीपासून सुरू करण्यात आलेल्या स्पोकन इंग्लिश या उपक्रमाची माहिती श्रीमती गीतांजली यांनी पालकांना दिली. शेवटी इयत्तेनुसार प्रत्येक तुकडीतून एक अशी पालक प्रतिनिधीची निवड करण्यात आली.

## गरीब व गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप

शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी श्री घाटकोपर ब्राह्मण समाजाच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. उमेश पांडे, संघटनेचे पदाधिकारी श्री. जयंत भट या मान्यवरांच्या उपस्थितीत आणि त्यांच्या हस्ते इ. ५वी ते ९वी च्या विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन व शिक्षक उपस्थित होते.

## आषाढी एकादशी दिंडी

दि. ५ जुलै २०२५ रोजी निसर्गमंडळ आणि इको-क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारी म्हणजेच दिंडीचे आयोजन करण्यात आले. प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात या कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी विठ्ठल रखुमाईच्या पालखीचे व ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पूजन केले.

उपमुख्याध्यापिका श्रीमती देसाई यांनी पाहुण्यांचे स्वागत व कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. इ. ७वी क ची विद्यार्थिनी कु. ईश्वरी हिने आषाढी एकादशी आणि वारी यांचे महत्त्व सांगितले. त्यानंतर निसर्ग मंडळातील इ. ७ वी च्या विद्यार्थिनींनी 'माऊली माऊली' या गाण्यावर टाळनृत्य सादर केले. इको-क्लबच्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण पूरक घोषवाक्याचे तक्ते बनवून आणले व त्यांचे नृत्याबरोबर सादरीकरण करण्यात आले.

प्रशालेच्या परिसरात विठोबाच्या हरिनामाच्या गजरात दिंडी काढण्यात आली. तसेच प्रशालेच्या मैदानात विद्यार्थ्यांनी टाळ नृत्य सादर केले. ग्यानबा-तुकाराम, माऊली-माऊली, विठ्ठल-विठ्ठल, विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला, अशा गजरांच्या तालात टाळ चिपळ्या, पताका, ढोलकी आणि मृदंगांच्या तालावर सर्वजण मंत्रमुग्ध झाले होते.

अनेक विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा पर्यावरण वाचवा', 'प्लॅस्टिकचा वापर टाळा, पर्यावरणाची काळजी घ्या' अशा घोषवाक्यांच्या आधारे पर्यावरणावरील प्रश्नांबाबत जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

तुळशीवृंदावन डोक्यावर घेऊन सहभागी झालेल्या महिला वारकरी, टाळ वाजवणारे वारकरी यांनी प्रशालेच्या मैदानात मोठे रिंगण केले. शिक्षक, विद्यार्थी यांनी फुगडी घालून या दिंडीचा मनमुदार आनंद घेतला.

## गुरूपौर्णिमा अहवाल

गुरुवार दि. १० जुलै २०२५ रोजी प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात गुरूपौर्णिमेचा कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा केला.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार तसेच उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांच्या हस्ते महर्षी व्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला आणि कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. इ. ५वी च्या विद्यार्थ्यांनी गुरू-शिष्य परंपरा, गुरूंचे महत्त्व, गुरूं विषयी वाटणारे प्रेम आणि गुरूंविषयीचा आदर व्यक्त करणाऱ्या कथा, गीते तसेच भाषणे सादर केली. त्यांच्या मनात असलेल्या गुरूं विषयीचा आदरभाव व्यक्त केला. तसेच कार्यक्रमासाठी उपस्थित असणाऱ्या सर्व गुरूजनांना विद्यार्थ्यांच्या हस्ते पुष्प देऊन त्यांचा सन्मान केला.

मुख्याध्यापिका श्रीमती पोतदार यांनी गरूशिष्याविषयी अतिशय साध्या सोप्या भाषेत मार्गदर्शन केले.

तसेच श्रीमती ज्योती देसाई यांनी विद्यार्थ्यांना गुरूचे महत्त्व समजावून दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती जयश्री मोहिते यांनी केले. तर इ. ५वी च्या वर्गशिक्षिका श्रीमती प्रज्ञा गावडे यांनी गरूविषयीचा महिमा विद्यार्थ्यांना सांगितला. आभार प्रदर्शन श्री. विजय पाटील यांनी केले.

**उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५**

शैक्षणिक वर्ष फेब्रुवारी २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ५वी चे ७० विद्यार्थी प्रविष्ट झाले त्यापैकी १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती प्राप्त धारक आहेत ते खालीलप्रमाणेः

| **विद्यार्थ्यांचे नाव** | **रँक** |
|---|---|
| कु. मोक्ष प्रणील सावंत | K-१७२ |
| कु. संकेत संजय सरगर | K-२७८ |
| कु. विराज राजेंद्र काळे | K-३५४ |
| कु. हर्षदा संतोष ठोंबरे | K-५०२ |
| कु. वेदिका संतोष खराडे | K-५५१ |
| कु. निहार महेंद्र गडिये | K-६६६ |
| कु. आयुष महादेव दुधाळ | K-८७२ |
| कु. दर्शिता संजय सुतार | K-८७९ |
| कु. आयुष विजय पाटील | K-११२९ |
| कु. अपूर्वा विशाल ननावरे | K-११३३ |
| कु. सेजल दीपक जाधव | K-१४८४ |
| कु. तेजय विजय साबळे | K-१४८८ |
| कु. आश्का संतोष खरात | K-१६२० |
| कु. श्रीराज संदिप फड | K-१७६९ |

विशेष म्हणजे शाळेची परंपरा आबाधित राखत यंदाच्या वर्षी ही शाळेची गुणवत्ता व दर्जा कायम ठेवून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार विद्याभवन प्रशाला संपूर्ण घाटकोपर विभागातून मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

**उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२४-२५**

फेब्रुवारी २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ८वी चे ६३ विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी १२ विद्यार्थी शिष्यवृत्ती प्राप्त धारक आहेत ते खालीलप्रमाणेः

| **विद्यार्थ्याचे नाव** | **रँक** |
|---|---|
| कु. आर्या विलास सावंत | K-९३ |
| कु. तनिश विनोद वाघमारे | K-१३१ |
| कु. हर्ष मंगेश गोटम | K-२७० |
| कु. आर्या अमोल हांडे | K-४६२ |
| कु. यशस्वी सत्यम कांबळे | K-८०५ |
| कु. विधी सुनील जाधव | K- ८०८ |
| कु. स्वराली शरद पवार | K-९२० |
| कु. त्रिशा राजेश गांगरकर | K-१०३० |
| कु. क्रांती अशोक नरावडे | K-१०४५ |
| कु. तेजश्री ज्ञानेश्वर मोहन | K-११५३ |
| कु. चिन्मय दत्ताराम घाणेकर | K-१२९४ |
| कु. गायत्री प्रविण बोऱ्हाडे | K-१४४२ |

**शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**हाऊस इलेक्शन**

गुरुवार दि. १० जुलै २०२५ रोजी पृथ्वी, जल, वायू, अग्नी या गटाच्या प्रतिनिधींची लोकशाही पद्धतीने निवडणूक घेण्यात आली.

दि. १० जुलै २०२५ रोजी प्रत्यक्ष मतदान घेण्यात आले. सर्व इ.५वी ते इ.९वी च्या विद्यार्थ्यांनी आपले मत देऊन यशस्वीरित्या मतदान प्रक्रिया पार पाडली. दि. १२ जुलै २०२५ रोजी निवडणूकीचा निकाल जाहीर करण्यात आला.

मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई यांनी सर्व निवडून आलेल्या प्रतिनिधींचा शपथविधी घेतला.

या मतदान प्रक्रियेची तयारी श्री. मांडवेकर, श्री. मस्के, श्रीमती जायभाये यांनी सर्व शिक्षकांच्या मदतीने यशस्वीरित्या पार पाडली.

# विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनील भालचंद्र पाटील**

### विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप

घाटकोपर मधील ब्राह्मण समाजा तर्फे बुधवार दि. १८ जून २०२५ रोजी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करण्यात आले. एकूण ६० विद्यार्थ्यांना प्रत्येकी १० वह्या घाटकोपर ब्राह्मण समाजाच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. उमेश पांडे व संघटनेचे पदाधिकारी श्री. जयंत भट यांच्या हस्ते देण्यात आल्या. यावेळी उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर उपस्थित होत्या. श्रीमती लता नायर यांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

### पालक सभा २०२५-२६

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील सर्व वर्गाच्या पालक सभा शनिवार दि. २१ ते सोमवार दि. ३० जून २०२५ या कालावधीत पार पडल्या. सदर सभेस मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन तसेच सर्व वर्गशिक्षक उपस्थित होते. या सभेत मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी उपस्थित सर्व पालकांचे स्वागत केले. इ. १०वी चा निकाल, स्कॉलरशिप परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांची माहिती पालकांना दिली. सर्वच पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच शाळेची शिस्त, विद्यार्थी, पालक व शाळा यांच्यासमोर असलेले प्रश्न व त्यावर आपल्या सर्वांची भूमिका काय असावी या बाबत चर्चा केली. प्रत्येक सभेत समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन यांनी पालकांना बहुमूल्य मार्गदशन केले. सभेच्या शेवटी प्रत्येक वर्गाच्या पालक प्रतिनिधींची नेमणूक करण्यात आली. पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार यांनी प्रत्येक सभेत शेवटी पालकांचे आभार मानले.

### शिष्यवृत्ती परीक्षेत विद्याभवन हायस्कूल नं.२ चे घवघवीत यश

महाराष्ट्र परीक्षा परिषद, पुणे यांच्यातर्फे फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८वी) मध्ये पुणे विद्यार्थी गृहाच्या घाटकोपर शाखेतील विद्याभवन हायस्कूल नं. २, च्या एकूण ६३ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करून उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५वी) तील २६ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ८वी) मधील ३७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली.

सर्व मार्गदर्शक शिक्षक, दोन्ही माध्यमांचे मुख्याध्यापक, इतर पदाधिकारी, सर्व विद्यार्थी व पालकांचे, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### गुरूपौर्णिमा उत्सव उत्साहात साजरा

विद्याभवन हायस्कूल नं.२ प्रशालेत शुक्रवार दि. १० जुलै २०२५ रोजी मराठी वाङ्मय मंडळातर्फे गरूपौर्णिमेचे आयोजन शाळेच्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले होते. इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने या कार्यक्रमात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी भाषणे, नाटक, गाणी आदी विविध संस्कृतिक कार्यक्रमातून गुरूचे जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.

मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील यांनी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणातून गुरूंचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील स्थान आणि गुरूपौर्णिमा साजरी करण्याचे महत्त्व उत्तम पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवले.

कार्यक्रमाची सांगता सुमधुर अशा 'गुरू चरित्राचे करा रे पारायण' या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांची विधान भवनाला भेट

शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी शाळेच्या १८ विद्यार्थ्यांनी राज्याच्या विधानभवनाला भेट दिली. विधिमंडळाच्या विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहाचे कामकाज विद्यार्थ्यांनी अगदी जवळून पाहिले. सत्ताधारी व विरोधी पक्षातील नेत्यांचा सभागृहातील सहभाग, नेत्यांची प्रश्नोत्तरे अगदी जवळून पाहिली. विद्यार्थ्यांसोबत मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व सहा. शिक्षिका श्रीमती संगीता मुंडे यांनी विधानभवनच्या भेटीत सोबत राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## नेल्टास महाअंतिम फेरी २०२४

इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढविण्यासाठी आणि कौशल्य विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरणारी परीक्षा म्हणजे नेल्टास होय. या परीक्षेची महाअंतिम फेरी नोव्हेंबर २०२४ मध्ये इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आली. या परीक्षेत विद्याभवन हायस्कूल नं. २ चे एकूण २२५ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९ विद्यार्थ्यांनी सुवर्णपदक, प्रमाणपत्र मिळवत गुणवत्ता यादीत झळकण्याची कामगिरी बजावली तसेच एका विद्यार्थ्याला Achiever's Title ने सन्मानित करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा! ❊❊❊

### ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ❊



श्रीमती स्वप्ना गायकवाड यांना 'बी द चेंज फाउंडेशन' तर्फे 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल अभिनंदन करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती प्राजक्ता वराडकर यांचा सन्मान करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे



विद्यार्थ्यांना मोफत वह्यांचे वाटप करताना ब्राह्मण समाजाच्या शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. उमेश पांडे, संघटनेचे पदाधिकारी श्री. जयंत भट व माध्यमिक इंग्रजी विभागाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती लता नायर डावीकडे माध्यमिक मराठी विभागाच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻




आंतरराष्ट्रीय योग दिन निमित्त योगासने करताना श्रीमती जयलक्ष्मी भट व विद्यार्थिनी



नेल्टास परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांसोबत मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील, उपमुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, पर्यवेक्षक श्री. प्रकाश पवार व सहा. शिक्षिका श्रीमती संगीता मुंडे




गुरूपौर्णिमा साजरी करताना पूर्व प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पर्यवेक्षिका श्रीमती पूजा फरिया, समन्वयिका श्रीमती लक्ष्मी गोपालकृष्णन, शिक्षक वृंद व विद्यार्थी वर्ग

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ✻



आषाढी एकादशी साजरी करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, माध्यमिक मराठी विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई व विद्यार्थी वर्ग



इ. १ ली ते इ. ४थी च्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या योजनेअंतर्गत पाठ्यपुस्तकांचे वितरण करताना शिक्षकेतर कर्मचारी श्री. भरत रांबाडे



आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासने करताना माध्यमिक मराठीचे विद्यार्थी




विधानभवनाला भेट देणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर माध्यमिक इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनील पाटील व सहा. शिक्षिका श्रीमती संगीता मुंडे.

# नेरूळ शाखा, नवी मुंबई

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**आंतरराष्ट्रीय योगदिन**

शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी ११वा आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी सहजयोग ध्यान यांच्या वतीने विद्यार्थी व शिक्षकांसाठी ध्यानधारणेसंदर्भात कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. सहजयोग परिवारातर्फे श्री. अहिवले, श्री. भरत पाटील, श्री. महेश जाधव, श्री. प्रल्हाद वऱ्हाडे, श्रीमती वीणा सोनार, श्रीमती नयना जाधव, श्रीमती ज्योती वऱ्हाडे, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी तुळशीचे रोपटे देऊन अतिथींचे स्वागत केले. सहजयोग परिवारातर्फे विद्यार्थ्यांना ध्यान म्हणजे काय? ते कसे करावे? याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. ध्यानाचे मानवी जीवनातील फायदे सांगण्यात आले. ध्यानामुळे लक्ष केंद्रित होते, एकाग्रता वाढते, शारीरिक, मानसिक आरोग्य सुधारते. यासाठी दररोज ध्यान करावे. यावेळी सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी ध्यानधारणा केली. त्यानंतर योगासनाचे विविध प्रकार सादर केले. कु. वेदिका कणसे या विद्यार्थिनीने योगदिनाबद्दल माहिती सांगितली.

**राजर्षी शाहू महाराज जयंती**

दि. २६ जून २०२५ रोजी राजर्षी शाहू महाराज निमित्त ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती मेघाराणी जोशी यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रतिमेला अभिवादन केले. श्रीमती नूतन गवांदे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याबद्दल माहिती सांगितली. कु. उल्का झगडे या विद्यार्थिनीने शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित कविता सादर केली

**गुरूपौर्णिमा**

ज्ञानदानाचा वसा घेतलेल्या विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत गुरूवार दि. १० जुलै २०२५ रोजी गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गुरूंची महती सांगणाऱ्या श्लोकांचे पठण करून गुरूंबद्दल आपल्या मनातील भावना विद्यार्थ्यांनी शब्दातून व्यक्त केल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून साकारलेली भेटकार्डे व विविध प्रकारची कागदी फुले बनवून शिक्षकांना समर्पित केली. पूर्व-प्राथमिक व प्राथमिकच्या काही विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षकांचे औक्षण करून त्यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी भाषणातून व गायनातून गुरूंची महती कथन केली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी आपल्या भाषणात कुलगुरू दादासाहेब केतकर व गुरूवर्य अण्णासाहेब खेर यांचे स्मरण करून त्यांच्या गुणांचा स्वीकार करा, त्यांच्यासारखे आचरण ठेवा असे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचे ऐकावे, चांगल्या गोष्टी शिकाव्या, चांगले नागरिक बनावे असे सांगून विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक केले व गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. इ. ५वी ते ७वीच्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी गुरूंचे आभार मानून त्यांना शुभेच्छा दिल्या.

**अभिनंदनीय**

**✻ शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५ वी) अंतिम निकाल**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत एकूण १० विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकले. शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी गुलाबपुष्प व पेढा देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

| विद्यार्थ्यांचे नाव | गुण | गुणवत्ता यादी क्रमांक (ठाणे जिल्ह्यातून) |
|---|---|---|
| कु. हार्दिक नितिन पयेर | २४६ | १५ |
| कु. श्रीकृष्णा दत्तात्रय आटपाडकर | २२६ | ५६ |
| कु. आराध्य संदिप चव्हाण | २२६ | ५७ |
| कु. मनोराज रुपेश कळंत्रे | २२४ | ६४ |
| कु. अनिक हेमंत पिसे | २१२ | ११२ |
| कु. विहान प्रणय पडवळ | २१० | १२५ |
| कु. जान्हवी अशोक जाधव | २०२ | १७३ |
| कु. शिरिषा अतुल सावंत | १९० | ३०५ |
| कु. विहान अक्षय भोसले | १८२ | ४४७ |
| कु. पार्थ अतुल काशिद | १८२ | ४५० |

**※ मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा अंतिम निकाल**

फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये इ. २री ते इ. ७वीचे अनेक विद्यार्थी प्रविष्ट झाले. त्यापैकी दोन विद्यार्थिनींनी राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले.

| विद्यार्थिनीचे नाव | इयत्ता | राज्यस्तरीय गुणवत्ता यादी क्रमांक |
|---|---|---|
| कु. निहारिका प्रबोध फडके | २री | ५ |
| कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ | ७वी | २१ |

तसेच केंद्रस्तरावर पुढील विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

| विद्यार्थ्यांचे नाव | इ. | गुण | जिल्हा स्तर | राज्य स्तर | केंद्र स्तर |
|---|---|---|---|---|---|
| कु. शिवराज पवार | १ ली | १२४ | ९ | १४ | प्रथम |
| कु. अर्णव केंजाळे | २ री | १२६ | ८ | १३ | द्वितीय |
| कु. काव्या जाधव | ३ री | २५६ | १२ | २३ | प्रथम |
| कु. आरुषी मळेकर | ३ री | २२८ | २६ | ३७ | द्वितीय |
| कु. गौरव गवळी | ४ थी | २२८ | २७ | ३७ | प्रथम |
| कु. पियुष शिंदे | ८ वी | १९० | २३ | ५१ | प्रथम |
| कु. ओंकार शिंदे | ६ वी | १८४ | २६ | ५४ | द्वितीय |
| कु.अर्णव गायकवाड | ७ वी | १८८ | २१ | ५२ | प्रथम |
| कु. तन्वी म्हसकर | ७ वी | १५८ | ३६ | ६७ | द्वितीय |

**सर्व यशस्वी, गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

**एक राखी सैनिकांसाठी**

भारतीय सैन्य हे आपल्या देशाचे धैर्य, शौर्य आणि सामर्थ्य याचे उत्तम उदाहरण आहे. देशाच्या रक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी, सैनिकांबद्दल आदर, प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांना आपल्या भावना समर्पित कराव्यात या उद्देशाने रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने सुरक्षाबंधन या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी सैनिकांसाठी स्वत: सुंदर राख्या बनविल्या. शुभेच्छापत्रे तयार करून त्यावर सैनिकांसाठी संदेश व शुभेच्छा लिहिल्या. सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रावसाहेब फाउंडेशनच्या कार्यकर्त्यांनी शाळेत येऊन राख्या व शुभेच्छापत्रांचे संकलन केले. याप्रसंगी त्यांनी संस्थेने केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले.

**विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक**

जे विद्यार्थी उद्याचा भारत घडविणार आहेत, जे भारताचे भविष्य आहेत, त्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनातच लोकशाहीचे बाळकडू मिळावे म्हणून प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया समजून घेता यावी, यासाठी दि. १२ जुलै २०२५ रोजी विद्यार्थी मंत्रिमंडळासाठी निवडणूक घेण्यात आली. पृथ्वी, वायू, जल, अग्नी, या प्रत्येक गटातील इ. सातवीचे इच्छुक उमेदवार निवडणुकीसाठी उभे राहिले. प्रत्येक उमेदवाराचा अर्ज भरण्यात आला. निवडणुकीचे चिन्ह ठरविण्यात आले. प्रत्येक उमेदवार विद्यार्थ्यांने आपापल्या गटाचा धुमधडाक्यात प्रचार केला. शाळेच्या व्हीबी ॲपच्या मदतीने विद्यार्थ्यांनी आपापल्या पसंतीच्या उमेदवारास मत दिले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, सर्व शिक्षकवृंद

व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. प्रत्येक विद्यार्थ्याने मतदानाचा अनुभव घेतला.

**विद्यार्थी सुरक्षा व्याख्यान**

दि. १६ जुलै २०२५ रोजी इ. ५वी ते ७वी व दि. ४ जुलै २०२५ रोजी इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श यासंदर्भात जागृती करणारा उपक्रम घेण्यात आला. 'इनरव्हील क्लब ऑफ न्यू बॉम्बे सीसाईड' आणि 'अर्पण फाउंडेशन' यांच्यातर्फे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. श्रीमती पूनम व श्रीमती नवेंदर यांनी चित्रफीत दाखवून तसेच गोष्टींच्या माध्यमातून सुरक्षित स्पर्श व असुरक्षित स्पर्श याबद्दल माहिती सांगितली व विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण केली.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**प्रवेशोत्सव**

दि. ११ जून २०२५ रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा परिसर सुशोभित करण्यात आला होता. शिक्षिकांनी पारंपरिक पद्धतीने विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू व चॉकलेट्स देऊन नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीजा नायर, पर्यवेक्षिका अस्मिता सलगर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विद्यार्थ्यांना स्मार्ट बोर्डवर गोष्टी, गाणी तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रम दाखविण्यात आले. तसेच शाळेने उपलब्ध करून दिलेल्या सेल्फी पॉईंट वर विद्यार्थ्यांचे फोटो घेण्यात आले.

**११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन**

दि. २१ जून २०२५ रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना योगासनांची माहिती, महत्त्व तसेच फायदे समजावून सांगितले. योगासनांमुळे मानसिक तसेच शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहते असे सांगून सर्वांनी नियमितपणे योगासने केली पाहिजेत असे सांगण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना पद्मासन, ताडासन, वृक्षासन व पर्वतासन इ. योगासनांचे प्रकार करून दाखविले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांकडून अनुरूप अशी योगासने करून घेण्यात आली.

**प्रवेशोत्सव (पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी)**

बुधवार दि. ११ जून २०२५ रोजी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विविध रंगांच्या फुग्यांनी व क्राफ्ट पेपरची फुले बनवून शाळेचा परिसर व वर्ग सुशोभित करण्यात आले होते. नर्सरी, छोटा शिशु व मोठा शिशु वर्गाच्या सर्व विद्यार्थ्यांना औक्षण करून पेन, पेन्सिल किट व चॉकलेट्स देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, पूर्व-प्राथमिक व प्राथमिक विभागाचे सर्व शिक्षक उपस्थित होते.

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापक : श्री. गोरख कदम**

**काव्यधारा कार्यक्रमाचे आयोजन**

दि. ४ जुलै २०२५ रोजी 'काव्यधारा' या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या कल्पनाशक्तीला व उपक्रमशीलतेला वाव देण्यासाठी रसिक कवी श्री. दिलीप जांभळे (निवृत्त जनरल मॅनेजर, आर सी. एफ.) हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कुलसचिव

श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक व पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात आई, बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, मित्र, मैत्रिणी, पाऊस, निसर्ग, आयुष्य अशा विविध विषयांवर आधारित कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, आदर्श शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी, शिक्षिका श्रीमती अश्विनी चौधरी व नीना सिंग यांनी देखील कविता सादर केल्या. रसिक कवी श्री. दिलीप जांभळे यांनी काव्यधारा या उपक्रमाचे कौतुक केले व कविता कशा निर्माण होतात, हे सुंदर रीतीने स्पष्ट केले. कवितेचा इतिहास सांगताना त्यांनी कला व विद्या यातील फरक विद्यार्थ्यांना सांगितला. विठ्ठल नावाची संकल्पना स्पष्ट करून विठ्ठल महिमा कवितेतून सादर केला. आई-बाबांना पालेभाज्या समजणाऱ्या मुलांचा खरपूस समाचार त्यांनी आपल्या कवितेतून घेतला. तर विविध कविता सादर करून कवितेचे विश्व उलगडले. तसेच बालकविता, चारोळ्या व 'आम्ही तिघे भाऊ, एका खांबावर राहू' ही रस्त्यावर असलेल्या सिग्नलच्या रंगांची गंमत सांगणारी कविता चाल देऊन सादर करून विद्यार्थ्यांना खुश केले. तसेच विडंबन कविता देखील सादर केल्या. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक सुजय वाबळे यांनी केले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**मंथन सामान्य ज्ञान परीक्षा**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मंथन सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थी कु. प्रत्युष बाबाजी पडवळ इ. २री याने राज्यस्तरावर ६ वा तर जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला. **कु. प्रत्युष पडवळ याचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**गुड टच, बॅड टच व्याख्यान**

दि. ४ जुलै २०२५ रोजी विद्याभवन शाळा, नेरुळ येथे इनरव्हील क्लब यांच्यातर्फे 'गुड टच, बॅड टच' या विषयावर प्राथमिक इंग्रजी व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानात इनरव्हील क्लबचे सहकारी श्रीमती पूनम, किरण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आपण कशाप्रकारे अशा प्रकरणात फसतो हे त्यांनी अनेक गोष्टी व चित्रकथा दाखवून विद्यार्थ्यांना समजावले व अशा वेळेस आपण काय करून स्वत:ला सुरक्षित ठेऊ शकतो हे सांगितले. आपण आई वडिलांपासून कोणतीही गोष्ट लपवून ठेऊ नये. असा महत्त्वपूर्ण सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. याशिवाय सर्वच स्पर्श हे चुकीचे नसतात, मग कोणती गोष्ट चुकीची व कोणता स्पर्श चुकीचा (अयोग्य) हे देखील त्यांनी विद्यार्थ्यांना चित्रांमधून समजावले. कार्यक्रमाच्या शेवटी आपले शरीर सुरक्षित ठेवण्याची शपथ विद्यार्थ्यांकडून घेण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थी या व्याख्यानास उपस्थित होते.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

**शिष्यवृत्ती परीक्षेतील सुयश**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने फेब्रुवारी २०२५ मध्ये घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ५वी व इ. ८वीच्या एकूण १७ विद्यार्थ्यांची ठाणे जिल्ह्यातून शिष्यवृत्तीसाठी निवड झालेली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. ५वी निकाल**

| विद्यार्थ्यांची नावे | प्राप्त गुण | प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| कु. चैतन्य विक्रम चव्हाण | २३४ | ३२ वा |
| कु. दक्ष विनायक परब | २२८ | ४६ वा |
| कु. अर्णव दशरथ सावंत | २१२ | १०१ वा |
| कु. तन्वीर सिंग विनोद राजपुरोहित | २०६ | १३८ वा |
| कु. हेमन कुमार विकाश चौधरी | २०२ | १७० वा |
| कु. आरोही निलेश भुजबळ | १८८ | ३२० वा |

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. ८वी निकाल**

| | | |
|---|---|---|
| कु. आरिझ फिरोज पटवेगार | २३२ | ३४ वा |
| कु. हर्ष विकास साठे | २२० | ५० वा |
| कु. ईशान सचिन चव्हाण | २१४ | ५६ वा |
| कु. अथर्व सुरेश गंजाळे | २१० | ६४ वा |
| कु. गार्गी रुपेश कांबळे | १९२ | १३० वा |
| कु. कोमल प्रल्हाद पवार | १८८ | १६८ वा |
| कु. अक्षरा अमर पाटणकर | १८४ | २०२ वा |
| कु. एल्जो जोसेफ पंजीकरण | १८० | २६३ वा |
| कु. तन्वी अनिलकुमार पुजारी | १७८ | २८२ वा |
| कु. कृपा सुरेश शितकर | १७४ | ३३६ वा |
| कु. प्रिन्स उमाशंकर वैश्य | १७२ | ३८२ वा |

**सर्व शिष्यवृती प्राप्त विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन!**

**गुरूपौर्णिमा**

दि. ९ जुलै २०२५ रोजी विद्याभवन माध्यमिक इंग्रजी विभागात गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात महर्षी व्यास यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. 'गुरूर्ब्रम्हा गुरू विष्णू' हा श्लोक व प्रार्थना म्हणण्यात आली. या प्रसंगी कु. सुहानी कांबळे, कु. गौरी आहेर, कु. आस्था तिवारी, कु. वेदांती जाधव या विद्यार्थिनींनी शिक्षकांविषयी आपले मनोगत व्यक्त केले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना गुरूंचे आपल्या जीवनातील स्थान व विद्यार्थ्यांची भूमिका यावर विचार व्यक्त केले व गुरूपौर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. शिक्षक श्री. रमेश राऊत, श्री. दत्तात्रय आटपाडकर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा व शुभाशीर्वाद दिले. याप्रसंगी इ. १०वीच्या विद्यार्थ्यांनी पूर्व-प्राथमिक, माध्यमिक मराठी व माध्यमिक इंग्रजीच्या सर्व शिक्षकांचे औक्षण करून गुरूंच्या चरणी नतमस्तक होऊन कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमास कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, श्रीमती अस्मिता सलगर, सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. ***



**प्रवेशोत्सवानिमित्त पेन्सिल किट व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करताना मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक**

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ❊




चॉकलेटस् व शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करताना शिक्षक



दि. २१ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सहज योग परिवारातर्फे ध्यानधारणा कार्यशाळेत ध्यानाला बसलेले विद्यार्थी




राजर्षी शाहू महाराज जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करताना शिक्षिका श्रीमती मेघाराणी जोशी, शिक्षक वृंद व विद्यार्थी

*** विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ***

**शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२४–२५**

**पूर्व उच्च प्राथमिक (इंग्रजी माध्यम)**



कु. चैतन्य विक्रम चव्हाण
प्राप्त गुण २३४
प्राप्त क्रमांक ३२



कु. दक्ष विनायक परब
प्राप्त गुण २२८
प्राप्त क्रमांक ४६



कु. अर्णव दशरथ सावंत
प्राप्त गुण २१२
प्राप्त क्रमांक १०१



कु. तन्वीर सिंग विनोद राजपुरोहित
प्राप्त गुण २०६
प्राप्त क्रमांक १३८



कु. हेमन कुमार विकाश चौधरी
प्राप्त गुण २०२
प्राप्त क्रमांक १७०



कु. आरोही निलेश भुजबळ
प्राप्त गुण १८८
प्राप्त क्रमांक ३२०

**शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२४–२५**

**पूर्व माध्यमिक (मराठी माध्यम)**



कु. प्रणिती रुपेश कळंत्रे
प्राप्त गुण २०६
प्राप्त क्रमांक ७८



कु. साक्षी दादासो ढाळे
प्राप्त गुण १८०
प्राप्त क्रमांक २९०

## ✲ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ✲
## शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२४-२५
### पूर्व माध्यमिक (इंग्रजी माध्यम)



कु. आरिझ फिरोज पटवेगार
प्राप्त गुण २३२
प्राप्त क्रमांक ३४



कु. हर्ष विकास साठे
प्राप्त गुण २२०
प्राप्त क्रमांक ५०



कु. ईशान सचिन चव्हाण
प्राप्त गुण २१४
प्राप्त क्रमांक ५६



कु. अथर्व सुरेश गंजाळे
प्राप्त गुण २१०
प्राप्त क्रमांक ६४



कु. गार्गी रुपेश कांबळे
प्राप्त गुण १९२
प्राप्त क्रमांक १३०



कु. कोमल प्रल्हाद पवार
प्राप्त गुण १८८
प्राप्त क्रमांक १६८



कु. अक्षरा अमर पाटणकर
प्राप्त गुण १८४
प्राप्त क्रमांक २०२



कु. एल्जो जोसेफ पंजीकरण
प्राप्त गुण १८०
प्राप्त क्रमांक२६३



कु. तन्वी अनिलकुमार पुजारी
प्राप्त गुण १७८
प्राप्त क्रमांक २८२



कु. कृपा सुरेश शितकर
प्राप्त गुण १७४
प्राप्त क्रमांक ३३६



कु. प्रिन्स उमाशंकर वैश्य
प्राप्त गुण १७२
प्राप्त क्रमांक ३८२

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरूळ शाखा, नवी मुंबई ❊
## शिष्यवृत्ती परीक्षा गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२४-२५ (ठाणे जिल्हा)
## पूर्व उच्च प्राथमिक (मराठी माध्यम)



कु. हार्दिक नितिन पयेर
प्राप्त गुण २४६
प्राप्त क्रमांक १५



कु. श्रीकृष्णा दत्तात्रय आटपाडकर
प्राप्त गुण २२६
प्राप्त क्रमांक ५६



कु. आराध्य संदिप चव्हाण
प्राप्त गुण २२६
प्राप्त क्रमांक ५७



कु. मनोराज रुपेश कळंत्रे
प्राप्त गुण २२४
प्राप्त क्रमांक ६४



कु. अनिक हेमंत पिसे
प्राप्त गुण २१२
प्राप्त क्रमांक ११२



कु. विहान प्रणय पडवळ
प्राप्त गुण २१०
प्राप्त क्रमांक १२५




कु. जान्हवी अशोक जाधव
प्राप्त गुण २०२
प्राप्त क्रमांक १७३



कु. शिरिषा अतुल सावंत
प्राप्त गुण १९०
प्राप्त क्रमांक ३०५



कु. विहान अक्षय भोसले
प्राप्त गुण १८२
प्राप्त क्रमांक ४४७



कु. पार्थ अतुल काशिद
प्राप्त गुण १८२
प्राप्त क्रमांक ४५०

# पंचवटी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**कुलगुरू डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांना अभिवादन**

रविवार दि. १५ जून २०२५ रोजी कुलगुरू कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते कुलगुरू कै. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नाशिक शाखेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**आश्रम वसतिगृहात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप**

सोमवार दि. १६ जून २०२५ रोजी आश्रम वसतिगृहात संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आश्रम वसतिगृहातील सुमारे दोनशे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांनी वसतिगृहात राहून सर्व विषयांचा चिकाटीने मनापासून अभ्यास केल्यास जीवनात उत्तम यश संपादन करता येते असे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले. सर्व उपस्थित मान्यवर यांनी मंत्री मा. ना. राधाकृष्ण विखे पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे स्वागत उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजश्री जोशी यांनी केले. श्री. तुकाराम मंडले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**पुणे विद्यार्थी गृह संचलित कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल प्री - प्रायमरी वर्गाचा उत्साहात प्रारंभ**

मंगळवार दि. १ जुलै २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह संचलित कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल प्री - प्रायमरी वर्गाचा शुभारंभ आनंदायी आणि उत्साही वातावरणात पार पडला. शाळेच्या पहिल्या दिवशी नव्याने प्रवेश घेतलेले चिमुकले बालगोपाळ आणि त्यांचे पालक यांची उस्फूर्त अशी उपस्थिती होती. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मनोबल वाढविण्यासाठी शाळेच्या प्रवेशद्वारी सजवलेले उंट, घोडे, आणि कार्टून पात्रांचे मिकी माऊस, छोटा भीम आणि भव्य देखावे उभारण्यात आले होते. फुग्यांची सजावट, रंगीत आकर्षक रांगोळ्या आणि गोड स्वागत गीतांनी सर्वांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांसाठी सर्व वर्गात आकर्षक खेळणी, आनंददायी शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात आले होते.

याप्रसंगी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सर्व बालगोपाळ आणि त्यांचे पालक यांचे स्वागत करून संस्थेच्या, शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेत कार्यपद्धतीची माहिती दिली. बाळगोपाळांच्या शैक्षणिक प्रवासाच्या यशासाठी शुभेच्छा दिल्या. आपली शाळा म्हणजे गुणवत्तापूर्वक इंग्रजी शिक्षण, मूल्यसंस्कार, बालमित्र वातावरण यांचा संगम असल्याचे तसेच संस्थेच्या शताब्दी महोत्सवात प्री-प्रायमरीच्या रूपाने नव्या अध्यायाची सुरूवात होत असल्याने आजचा दिवस महत्त्वाचा आहे असे उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी सांगितले.

ढोल ताश्यांच्या गजरात, शिक्षिका श्रीमती दीपा अडोळे आणि श्रीमती सोनल जोशी यांनी औक्षण करून सर्वांचे स्वागत केले. याप्रसंगी संस्थापक कुलगुरू दादासाहेब केतकर आणि देवी सरस्वती यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. शिक्षिका श्रीमती दीपा अडोळे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीमती सोनल जोशी यांनी अभ्यासक्रम आणि शालेय वर्षात राबविण्यात येणाऱ्या

विविध कार्यक्रमांबद्दल माहिती दिली. प्रा. दिलीप अहिरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, श्री. सुदाम सूर्यवंशी, श्री. सुनील पावसे, श्री. मकरंद मुळे, श्री. विशाल गोवर्धने आणि सर्व विद्यार्थी, पालक, हितचिंतक उपस्थित होते. ***

**✻ पंचवटी शाखा, नाशिक ✻**




**मंगळवार दि. १ जुलै २०२५ रोजी पुणे विद्यार्थी गृह संचलित कुलगुरू दादासाहेब केतकर इंग्लिश स्कूल प्री - प्रायमरी वर्गाच्या शुभारंभ प्रसंगी विद्यार्थ्यांचे व पालकांचे स्वागत करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्रा. दिलीप अहिरे आणि शिक्षिका**

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

### तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### दिंडी व रिंगण सोहळा

दि. ३ जुलै २०२५ रोजी आषाढी एकादशी निमित्त दिंडी सोहळा आणि रिंगण सोहळा मोठ्या आनंदात, उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी पांढरा पोशाख आणि गळ्यात टाळ अशा वारकऱ्यांच्या वेशभूषेत आणि विद्यार्थिनी नऊवारी साडी व डोक्यावर तुळशी वृंदावन अशा सुंदर वेशभूषेत तयार होऊन आले होते. यावेळी विठ्ठल रखुमाई च्या भोवती सर्व शिक्षक आणि सर्व विद्यार्थ्यांनी फेर धरला. सर्व विद्यार्थी, शिक्षक व मुख्याध्यापकांनी फुगडीचा आनंद घेतला. त्यानंतर गावातून हरीनामाचा गजर करत दिंडी काढण्यात आली. गावकऱ्यांनी मोठ्या उत्साहाने दिंडीचे पूजन करून स्वागत केले आणि दिंडीमध्ये सहभागी झाले. उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांनी दिंडी सोहळ्याला उपस्थित राहून सर्वांचा आनंद द्विगुणित केला.

### गणवेश वाटप कार्यक्रम

दि. ४ जुलै २०२४ रोजी देणगीदार सौ. शलाका विराज कुलकर्णी, पुणे यांनी दिलेले १७ गणवेश, देणगीदार पुष्पा दिलीप वाघ, कल्याण यांनी दिलेले १६ गणवेश, देणगीदार सौ. सविता राजेंद्र कुलकर्णी, नशिक यांनी दिलेल्या ११ गणवेश, देणगीदार सौ. सुवर्णा किशोर जोशी, ठाणे यांनी दिलेले ४ गणवेश व देणगीदार श्री. सखाराम शंकर जाधव यांच्या देणगी व्याज विनियोगातून २ गणवेश अशा एकूण ५० गणवेशांचे विद्यालयातील गरीब, गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी विद्यालय व संस्थेतर्फे देणगीदारांचे आभार मानले. सदर देणगी मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांचे अभिनंदन.

**विद्यार्थ्यांना छत्र्यांची भेट**

तळेगाव येथील प्रतिष्ठित नागरिक यांनी दिलेल्या रु.३,२००/- किमतीच्या १६ छत्र्यांचे वितरण विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी विद्यालय व संस्थेतर्फे देणगीदारांचे आभार मानले. सदर देणगी मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या श्री. लक्ष्मण चव्हाण यांचे अभिनंदन.

**गुरूपौर्णिमा**

दि.१० जुलै २०२५ रोजी विद्यालयात मातृ - पितृ पूजनाचा कार्यक्रम घेऊन गुरूपौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या पालकांना विद्यालयात आमंत्रित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या माता पित्यांचे व गुरूजनांचे पूजन केले. याप्रसंगी ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व पालकांना आणि विद्यार्थ्यांना सांगितले. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी गुरूंचा महिमा आपल्या भाषणातून सांगितला. प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांनी गुरूंचे प्रकार आणि महत्त्व सांगितले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. गुरूपौर्णिमेनिमित्त आलेल्या पालकांचे मनोरंजन करण्याच्या दृष्टीने आनंददायी संगीत खुर्चीचा कार्यक्रमही घेण्यात आला. विजेत्या पालकांना प्राचार्यांच्या हस्ते भगवद्गीता देण्यात आली.

**माता मेळावा**

दि. १० जुलै २०२५ रोजी विद्यालयात विशाखा समितीच्या वतीने माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला. यावेळी किशोरवयीन विद्यार्थिनींच्या आहार, आरोग्य याविषयी मार्गदर्शन माता पालकांना करण्यात आले. यावेळी माता पालक बहुसंख्येने उपस्थित होत्या. मेळाव्याचे संयोजन श्रीमती प्रीती राजपूत व सौ. सुषमा अमृतकर यांनी केले.

**आरोग्य मार्गदर्शन**

दि. ११ जुलै २०२५ रोजी विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना धनुर्वात इंजेक्शन देण्यात आले तसेच, धनुर्वात इंजेक्शन का घ्यावे? त्याचे मार्गदर्शन जातेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. जायभाये व डॉ. श्रीमती सोनवणे यांनी केले. धनुर्वात इंजेक्शन घेतल्यानंतर ORS च्या पाकिटाचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन श्रीमती संगीता कुवर व श्रीमती रक्षा शिवदे यांनी केले.

**आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धेत विद्या प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे देदीप्यमान यश**

दि. २ ते ९ जुलै २०२५ दरम्यान नेपाळ येथील पोखरा या ठिकाणी झालेल्या आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धेत आशियाई विभागात भारतीय संघाने अंतिम सामन्यात नेपाळ संघाचा दणदणीत पराभव करून सुवर्णपदक पटकावले. या विजयी संघात समावेश असलेल्या विद्यालयाच्या कु. रोहित रघुनाथ शिंदे व कु. पवन संजय खताळ या दोन विद्यार्थ्यांनी चमकदार खेळ करून भारतीय संघाच्या विजयात मोलाची कामगिरी बजावली. विद्यालयाच्या इतिहासात प्रथमच आपल्या विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील सुवर्णपदक प्राप्त झाले. या विद्यार्थ्यांना पर्यवेक्षक व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी, आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धेचे रेफ्री व क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. विजयी भारतीय संघातील विद्यालयातील खेळाडूंचा, त्यांच्या पालकांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com

**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

## ❊ विद्याप्रशाला हायसकूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं), नाशिक ❊



पोखरा (नेपाळ) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय लंगडी स्पर्धेत सुवर्णपदक मिळवणारे विद्यार्थी कु. रोहित रघुनाथ शिंदे आणि कु. पवन संजय खताळ तसेच त्यांच्या पालकांसमवेत उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, प्राचार्य श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक व ज्येष्ठ क्रीडा शिक्षक श्री. संजय जोशी, क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते



विविध देणगीदारांनी दिलेल्या देणगीतून गरजू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप प्रसंगी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी



गुरूपौर्णिमेनिमित्त मातृ पूजन करताना विद्यार्थिनी



माता मेळावा प्रसंगी माता पालकांशी संवाद साधताना सौ. सुषमा अमृतकर व श्रीमती प्रीती राजपूत

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

### शिक्षकांचे प्रेरणादायी प्रशिक्षण सत्र संपन्न

दि. ५ जून २०२५ रोजी शाळेच्या रौप्यमहोत्सवी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शिक्षकांचे सक्षमीकरण आणि आधुनिक शिक्षणतंत्रांचे प्रभावी अवलंब करण्यासाठी प्रोत्साहित करणे हा होता.

सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ डॉ. कुमुदिनी बांगेरा यांनी त्यांच्या प्रेरणादायी संवादातून शिक्षकांना आधुनिक अध्यापनाच्या नव्या तंत्रज्ञानांशी परिचित करून दिले. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रातील बदलत्या मागण्या आणि शिक्षकांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर प्रकाश टाकत संवाद साधला.

मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी डॉ. कुमुदिनी बांगेरा यांचा सन्मान केला. संवादात्मक सत्रात हसत खेळत शिक्षण कसे प्रभावी करता येईल, हे देखील सांगितले गेले.

शिक्षिका सौ. वैशाली गाजरे यांनी उपस्थितांचे आभार मानले. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व शाळेच्या शिक्षकांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण उपक्रम राबवून पर्यावरण संरक्षणाचा महत्त्वाचा संदेश दिला.

### दि. १० जून २०२५ पासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची सुरूवात उत्साहात झाली. विद्यार्थ्यांनी फीत कापून आणि मनमोकळ्या वातावरणात हसतमुखाने शाळेच्या प्रांगणात प्रवेश केला. वर्गशिक्षकांनी विद्यार्थ्यांचे आनंदाने स्वागत केले. सुंदर फोटो फ्रेम्स आणि आकर्षक सजावटीने वातावरण आनंददायक बनले होते.

### चॉकपासून कोडिंगपर्यंत

तंत्रज्ञान शिक्षणातील नवा प्रवाह तंत्रज्ञानाच्या अद्‌भुत दुनियेत परिवर्तन घडवण्यासाठी शिक्षकांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) विषयक संवादात्मक व रोचक सत्र 'इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड मोबाईल लॅब'मध्ये अनुभवले. या सत्रात रोबोटिक्स सर्किट्स आणि कोडिंगची मूलतत्त्वे वापरून शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहकार्याने विविध उपक्रम पूर्ण केले. टॅबलेट व किड्सचा वापर करून विद्यार्थ्यांनी रोमहर्षक कामे केली. शिक्षकांनी आधुनिक तांत्रिक ज्ञान आत्मसात केले. हे सत्र शिक्षणासाठी एक नवीन दृष्टीकोन ठरले.

### रौप्यमहोत्सवी वर्षाचा भव्य उद्‌घाटन समारंभ

दि. १६ जून २०२५ रोजी डॉ. काकासाहेब देवधर विद्यालयाने मूल्याधारित शिक्षणाची उत्कृष्ट परंपरा जोपासत २४ वर्षांची यशस्वी वाटचाल पूर्ण करत २५व्या रौप्य महोत्सवी वर्षात दिमाखात पदार्पण केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शिक्षक श्री. सतीश शिंपी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. सुंदर अशा स्वागत गीताच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला एक खास रंगत आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे निवृत्त एसीपी सीताराम कोल्हे यांच्या हस्ते व संस्थेच्या मान्यवरांच्या हस्ते संस्थेच्या संस्थापक सदस्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात शिक्षण क्षेत्रातील बदल, शिक्षकांची जबाबदारी आणि मानसिक आरोग्य यावर सखोल विचार व्यक्त केले. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना उपस्थितांना संस्थेच्या स्थापनेपासूनच्या प्रवासाची, कार्याची आणि आगामी

प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी या यशस्वी प्रवासात योगदान देणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग आणि हितचिंतकांचे आभार मानले. यावेळी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. आर्टिफिशियल इंटेलिजन्स या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची चित्रफित दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. सतीश शिंपी यांनी केले.

### जागतिक योग दिन उत्साहात साजरा

दि. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी शाळेच्या प्रांगणात सामूहिक योगाभ्यास करून साजरा केला. प्रशिक्षित योगाचार्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योगासने व प्राणायाम सत्र पार पडले. योगाच्या माध्यमातून आरोग्य, शिस्त व मानसिक शांततेचा संदेश दिला गेला.

### रस्ते सुरक्षा शिक्षण - जबाबदार तरुण नागरिक

विद्यार्थी शाळेमध्ये सायकलवर ये जा करत असतात. त्याच्या सुरक्षेसाठी त्यांना रस्ते सुरक्षा नियमांची माहिती असणे गरजेचे आहे. यासाठी इ.८वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'ट्रॅफिक एज्युकेशन पार्क' येथे क्षेत्रभेट आयोजित केली होती. या क्षेत्रभेटीचा उद्देश विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा, वाहतूक नियम, आणि शिस्त याविषयी प्रत्यक्ष अनुभवातून शिकवणे हा होता. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना ट्रॅफिक सिग्नल्स, वाहतुकीचे नियम, पादचारी नियम, आणि इतर सुरक्षा उपाय यांची माहिती देण्यात आली.

### अंमली पदार्थ विरोधी दिन

नाशिक म्हसरूळ शहर पोलीस दलाच्या सहकार्याने अंमली पदार्थ विरोधी जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे महत्त्व पटवून दिले. या कार्यक्रमास माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागातील विद्यार्थी उत्साहाने उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप ड्रग्स विरोधी प्रतिज्ञा घेऊन करण्यात आला.

### विद्यार्थ्यांसाठी हार्टफुलनेस रिलॅक्सेशन सत्र

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक प्रगती बरोबर मानसिक आरोग्य, एकाग्रता, ताण तणाव कमी व्हावा म्हणून दरवर्षी विद्यार्थ्यांना हार्ट फुलनेस संस्थेतर्फे शारीरिक व मानसिक शिथली करणाचे धडे दिले जातात. याचाच एक भाग म्हणून या शैक्षणिक वर्षासाठी हार्ट फुलनेस नागपूर विभागाच्या को-ऑर्डिनेटर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि विद्यार्थ्यांना एकाग्रता व आपले ध्येय प्राप्तीसाठी कसे प्रयत्न करावे याचे मार्गदर्शन केले.

***

### ❋ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक ❋




दि. १६ जून २०२५ रोजी २४ व्या वर्धापन प्रसंगी प्रमुख पाहुणे निवृत्त एसीपी सीताराम कोल्हे यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, देणगीदार श्रीमती सिंधुताई धामणकर, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

# हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.६.२०२५ ते ३०.६.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व


सिंधुताई त्र्यंबक केंघे

**●नाव** - **श्री. सदानंद त्र्यंबक केंघे, पुणे**
**देणगी** - रु. २५,००,०००/-
**दिनांक** - २०.६.२०२५
**निमित्त** - मातोश्री कै. सिंधुताई त्र्यंबक केंघे यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ११)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **एक्झिक्युटर्स टू इस्टेट ऑफ जी. एल. अभ्यंकर, द्वारा सौ. कल्याणी गोखले, पुणे**
**देणगी** - रु. ९,१३,५००/-
**दिनांक** - २७.६.२०२५
**निमित्त** - कै. गणपती लक्ष्मण अभ्यंकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्री. मनीष यशवंत भोपटकर, पुणे**
**श्री. पूषण धनंजय भट, डोंबिवली**
**डॉ. रेवती धनंजय भट, डोंबिवली**
**देणगी** - रु.६५,०००/-
**दिनांक** - २४.६.२०२५


यशवंत भोपटकर आणि मंदाकिनी भोपटकर

**निमित्त** - कै. यशवंत भिकाजी भोपटकर व कै. सौ. मंदाकिनी यशवंत भोपटकर यांचे विवाह वाढदिवसानिमित्त व स्मृतिदिनानिमित्त (५ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी रु. ५०,०००/- विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना हाफपॅन्ट व टीशर्ट घेण्यासाठी, उर्वरित देणगी रु. १५,०००/- व्याजविनियोग अन्नदान


काशिनाथ गानू

**●नाव** - **श्री. सतीश काशिनाथ गानू, धुळे**
**देणगी** - रु. ५१,०००/-
**दिनांक** - ३०.६.२०२५
**निमित्त** - कै. काशिनाथ रामचंद्र गानू यांचे जयंतीनिमित्त (१ जुलै)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान


शशिकांत जोशी

**●नाव - श्री. तेजस शशिकांत जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ३५,०००/-
**दिनांक** - २८.६.२०२५
**निमित्त** - कै. शशिकांत हरिभाऊ जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. २५,०००/- रक्कम विनियोग शैक्षणिक मदत, उर्वरित रु. १०,०००/- व्याज विनियोग मिष्टान्न


श्यामसुंदर देशमुख

**●नाव - श्री. प्रसाद श्यामसुंदर देशमुख, ठाणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ५.६.२०२५
**निमित्त** - कै. श्यामसुंदर दिगंबर देशमुख (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव - राष्ट्रतेज मंच, मुंबई**
**देणगी** - रु. २५,०००/- **दिनांक**-१०.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग शैक्षणिक मदत


पांडुरंग जोशी

**●नाव - श्रीमती विजया पांडुरंग जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - ९.६.२०२५
**निमित्त** - कै. पांडुरंग दत्तात्रय जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद शुध्द १४)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

**●नाव - श्री. रमेश भास्कर ढमढेरे, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - कै. रविंद्र भास्कर ढमढेरे (११ जून) व आई कै. श्रीमती इंदिरा भास्कर ढमढेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव - श्री. चिंतामणी पु. रत्नपारखी, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २३.६.२०२५
**निमित्त** - कै. वडील (७ ऑगस्ट २०२५)
कै. मातोश्री (२० मार्च २०२६)
कै. बहीण (२० जून २०२६)
कै. मुलाच्या (१ फेब्रुवारी २०२६)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संबंधितांचे स्मृतिदिनी अन्नदान

**●नाव - श्री.कन्हैयालाल रणछोडदास सुंगधी, पुणे**
**देणगी** - रु. १२,०००/-
**दिनांक** - १८.६.२०२५
**निमित्त** - कै. शकुंतला रणछोडदास सुगंधी (२५ जुलै),
कै. रणछोडदास मनमोहनदास सुगंधी (४ फेब्रुवारी) यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. ६,०००/- व्याज विनियोग अन्नदान, उर्वरित देणगी रु. ६,०००/- शैक्षणिक मदत



लक्ष्मण दुसाने

**●नाव - श्री. दुसाने बंधू द्वारा श्री. अविनाश दुसाने, ठाणे**
**देणगी** - रु. १०,००१/-
**दिनांक** - २१.६.२०२५
**निमित्त** - कै. लक्ष्मण जी. दुसाने (सोमपूरकर) (मा. वि.) यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ शुध्द ९)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग मिष्टान्न



मंदाकिनी गोगावले

**●नाव - श्रीमती वैजयंती सदाशिवराव गोगावले, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २५.६.२०२५
**निमित्त** - कै. मंदाकिनी सदाशिवराव गोगावले यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ शुध्द २)
**विनियोग** - देणगी रु. १०,०००/- व्याज विनियोग शैक्षणिक मदत उर्वरित देणगी रु. १,०००/- अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

**●नाव - श्री. विनय मनोहर जगदाळे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - ११.६.२०२५
**निमित्त** - कै. मालती मनोहर जगदाळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

**●नाव - श्री. चंद्रहास यशवंत पाध्ये, मुंबई**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २६.६.२०२५
**निमित्त** - कै. उषा यशवंत पाध्ये (१०.१.२०२६)
कै. अनिल केशव कर्वे (५.६.२०२६)
कै. शीला यशवंत पाध्ये (११.२.२०२६)
कै. बाळकृष्ण जाधव (१.७.२०२६)
कै. केशव गजानन कर्वे (१.७.२०२६)
कै. सुशिला केशव कर्वे (२९.११.२०२६)
कै. सुमती वसंत गुप्ते (१८.७.२०२६)
कै. तारामती यशवंत पाध्ये (६.२.२०२६)
कै. वसंत रामकृष्ण गुप्ते (२.५.२०२६)
कै. यशवंत केशव पाध्ये (८.५.२०२६)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - सौ. इंदिरा सदाशिव हिवसे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - २८.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

**●नाव - डॉ. नंदकिशोर भालचंद्र देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २.६.२०२५
**निमित्त** - कै. भालचंद्र खंडेराव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२३ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव - श्रीमती सुषमा अनिल कर्वे व श्रीमती उमा कर्वे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/- **दिनांक** - ५.६.२०२५
**निमित्त** - कै. अनिल केशव कर्वे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रु. २,५००/- विनियोग अन्नदान उर्वरित रु. २,५००/- शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती वर्षा प्रदीप जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती पुष्पा धोंगडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - कै. कृष्णाजी रामचंद्र वाघमारे (५ जुलै)
कै. विठाबाई कृष्णाजी वाघमारे
(१ नोव्हेंबर)
कै. रविंद्र रामकृष्ण धोंगडे (७ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


प्रिया सातपुते

●**नाव** - **सौ. सुवर्णलता चंद्रकांत काळे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २६.६.२०२५
**निमित्त** - कै. सौ. प्रिया चेतन सातपुते यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद वद्य ९)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्रीमती विमल दत्तात्रय तासगांवकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २८.६.२०२५
**निमित्त** - कै. दत्तात्रय विष्णु तासगांवकर
यांचे स्मृतिदिनानिमित्त (८ जुलै)
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग अन्नदान

## देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-

●**नाव** - **श्री. गिरीश श्रीधर लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ३,५००/-
**दिनांक** - २०.६.२०२५
**निमित्त** - कै. श्रीधर विठ्ठल लिमये
यांचे स्मृतिदिनानिमित्त (२१ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार

## देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-

●**नाव** - **श्रीमती सुनंदा जगन्नाथ देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - २.६.२०२५
**निमित्त** - कै. जगन्नाथ दत्तात्रय देशपांडे यांचे
स्मृतिदिनानिमित्त (१६ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


ॲड.एस.एन.चंद्रचूड

●**नाव** - **ॲड. एस. एन. चंद्रचूड, पुणे**
**देणगी** - रु. २,००२/-
**दिनांक** - २३.६.२०२५
**निमित्त** - प्रतिमहाप्रमाणे सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. प्रदीप हरी जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - कै. श्रीमती माधुरी हरी जोशी
यांचे स्मृतिदिनानिमित्त (१६ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
अन्नदान

**●नाव** - **श्री. मनोहर माधव देव व सौ. श्वेता गौतम जोग, मुंबई**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - ३०.६.२०२५
**निमित्त** - कै. मंगलाबाई माधव देव यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ शुध्द पंचमी)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कमेचा विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना हाप पॅन्ट व टी शर्ट घेण्यासाठी प्राप्त

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

**●नाव** - **श्रीमती श्रध्दा दिलीप पाठक, पुणे**
**देणगी** - रु. १,५०१/-
**दिनांक** - ३.६.२०२५
**निमित्त** - कै. गणपत अनंत पाठक यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. गणेश अनंत छत्रे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २.६.२०२५
**निमित्त** - कै. सौ. वैजयंती अनंत छत्रे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. श्रीकांत व चिंतामणी वासुदेव देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २.६.२०२५
**निमित्त** - कै. पुष्पलता वासुदेव देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. राजेंद्र रमेश खिरे, पुणे**
**देणगी** - रु. १,००२/-
**दिनांक** - ५.६.२०२५
**निमित्त** - कै. रमेश चिंतामण खिरे व कै. विजया रमेश खिरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्रीमती कुंदा म्हैसकर, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - आप्तेष्टांचे पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**●नाव** - **श्री. अरुण वसंत बोकिल, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - कै. सिंधु वसंत बोकिल यांचे स्मृतिदिनानिमित्त (१७ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **सौ. भारती सतीश काळे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - कै. नलिनी यशवंत काळे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्रीमती अनुराधा अशोक जोशी, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १८.६.२०२५
**निमित्त** - कै. अशोक रामचंद्र जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. श्रीपाद रामचंद्र गोरे, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २४.६.२०२५
**निमित्त** - कै. रामचंद्र गोविंद गोरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २४.६.२०२५
**निमित्त** - कै. गोविंद लक्ष्मण भालेराव यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्रीमती श्रीजा बाबुराव नायर, नेरुळ नवी मुंबई**
**देणगी** - रु. १,१००/-
**दिनांक** - २६.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**


श्री.कृष्णाजी कुलकर्णी

●**नाव** - **श्री. कृष्णाजी मारुती कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २७.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग सिंधुताई केंघे मुलींचे वसतिगृह वाढीसाठी

●**नाव** - **श्री. दीपक एकनाथ नेलेकर, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २६.६.२०२५
**निमित्त** - कै. एकनाथ गणपत नेलेकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ शुध्द १)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

●**नाव** - **श्री. दत्तात्रय बजरंग शिंदे (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ११/-
**दिनांक** - १६.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्रीमती आरती ब्रह्मे, पुणे**
**देणगी** - रु. २०/-
**दिनांक** - १७.६.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **बी. के. इंडस्ट्रिज, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २०.६.२०२५
**निमित्त** - बी. के. इंडस्ट्रिज दुसरी शाखा उद्घाटनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

- **श्री. राधाकृष्ण अवधूत तपस्वी, पुणे**
  कै. सौ. लक्ष्मीबाई अवधूत तपस्वी,
  कै. अवधूत गोपाळ तपस्वी, कै. शालिनी तपस्वी
  यांचे पुण्यस्मरणार्थ इ. ५ वी ते १० वी पुस्तके,
  वही १०० पानी फुलस्केप १ डझन,
  २०० पानी १ डझन, रु. ४,९२३/-
- पार्वती महादेव खळदकर ट्रस्ट
  द्वारा श्री. विवेक बाळकृष्ण तडवळकर, पुणे
  ज्वारी ४० कि., रु. २,०००/-
- कु. दिक्षा मंगेश कुडले, पुणे
  स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
  ७ कि. गूळ, ५ कि. हरभरा डाळ, रु. ९९०
- कु. रुचा मिलिंद ढमढेरे, पुणे
  बासमती तांदूळ १० कि., साखर ५ कि.,
  रु. ७७५/-

**वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**


श्री.कृष्णाजी कुलकर्णी

**●नाव** - **श्री. कृष्णाजी मारूती कुलकर्णी, (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ३.६.२०२५
**निमित्त** - सौ. गौरी कृष्णाजी कुलकर्णी वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याजाचा विनियोग मिष्टान्न

**●नाव** - **श्री. मनीष मुकुंद नाईक (मा. वि.), पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २०.६.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

***

**दुरुस्ती समाचार माहे मे २०२५ पृष्ठ क्र. ४७**

**●नाव** - **कै. अशोक बाळुराव जोशी, कै. अनिता अशोक जोशी, श्री. अनिल जोशी, सौ. सुनिता जोशी, श्री. सुभाष जोशी, सौ. अंजली जोशी, श्री. वसंत कार्लेकर, सौ. जयश्री कार्लेकर आणि श्री. सतीश कुंटे, वडोदरा, गुजरात**


बाळुराव जोशी व सुधा जोशी

**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २६.३.२०२५
**निमित्त** - कै. बाळुराव हरिराव जोशी, कै. सुधा बाळुराव जोशी, यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग संस्थावाढीसाठी

***

**दुरुस्ती समाचार माहे जून २०२५ पृष्ठ क्र. ४८**

- **कु. उज्वला रामचंद्र देशपांडे, पुणे**
  कै. सुधीर रामचंद्र देशपांडे,
  कै. दिलीप रामचंद्र देशपांडे यांच्या
  स्मृतिदिनानिमित्त, ५ कि. लाडू (मोतीचूर),
  फुल ड्रेस ४ विद्यार्थ्यांसाठी रु. ४,३००/-

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगांव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**उपाकार्याध्यक्ष – श्री. अमोल जोशी**
**दि. १.७.२०२५ ते २४.७.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

● **नाव** - **श्रीमती प्रतिभा बापूराव ठाकूर, नाशिक**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २४.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - तळेगाव शाखा वाढीसाठी

वस्तुरूप देणगी

● **नाव** - **श्रीमती प्रतिभा बापूराव ठाकूर, नाशिक**
**देणगी** - रु. २०,०००/- चे लाऊड स्पीकर व माईक सेट
**दिनांक** - २४.७.२०२५
**निमित्त** - कै बापूराव लोटन ठाकूर यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त

● **नाव** - **सौ. शलाका विराज कुलकर्णी, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/- चे १७ गणवेश
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी

● **नाव** - **सौ. पुष्पा दिलीप वाघ, कल्याण**
**देणगी** - रु. ९,७३०/- चे १६ गणवेश
**दिनांक** - २४.७.२०२५
**निमित्त** - कै बापूराव लोटन ठाकूर यांच्या द्वितीय पुण्यतिथीनिमित्त

● **नाव** - **सौ. सविता राजेंद्र कुलकर्णी, नाशिक**
**देणगी** - रु. ६,५००/- चे ११ गणवेश
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी

● **नाव** - **श्री. शरद पोपटराव कोठावदे, नाशिक**
**देणगी** - रु. ३,२००/- चा थर्मास
**निमित्त** - सदिच्छा देणगी

● **नाव** - **सौ. सुवर्णा किशोर जोशी, ठाणे**
**देणगी** - रु. २,२००/- चे ४ गणवेश
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी

● **नाव** - **सौ. अश्विनी चेतन गोऱ्हे, नाशिक**
**देणगी** - रु. २,१००/- चे प्रथमोपचार साहित्य
**दिनांक** - १४.७.२०२५
**निमित्त** - विवाह वाढदिवसानिमित्त

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**दि. २०.६.२०२५ ते २१.०७.२०२५**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

● **नाव** - **श्रीमती मानसी सचिन विचारे, ठाणे**
**देणगी** - रु. ५,१२१/-
**दिनांक** - ११.७.२०२५
**निमित्त** - स्वतःच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

***

## ✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻






संस्थेचे देणगीदार श्री. संजीव शांताराम मोघे, पुणे यांनी वडील कै. शांताराम सीताराम मोघे (मा. वि.) यांचे पुण्यस्मरणार्थ रु. ३ लाखांची देणगी दिली. सदर देणगी संपूर्ण रकमेचा विनियोग संस्थेच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, आणि विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, पुणे येथील एकूण १५ गरीब, गरजू व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी करण्यात आला. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांना धनादेशाचे वितरण दि. १९ जुलै २०२५ रोजी देणगीदारांच्या शुभहस्ते करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित देणगीदार, संस्थेचे पदाधिकारी, संचालक, प्राचार्य आणि विद्यार्थी

## ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ✻



डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी

**Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001***
**[Publication Date 13.8.2025 Posting Date 15.8.2025]**
**SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016**
**License No. WPP - 56/2023-2025**




दि. १५ जून २०२५, पंचवटी शाखा, नाशिक येथे संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष मंत्री मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप प्रसंगी उपस्थित कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ आणि मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦

▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे